cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१४ | गुरूवार दि.०२ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### कुपोषणाच्या विळख्यातून मुक्ती

समाजातील कोणतीही मोठी समस्या ही केवळ सरकारच्या धोरणांनी किंवा समाजाच्या प्रयत्नांनी स्वतंत्रपणे सुटत नाही. त्या समस्येवर प्रभावी आणि कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सरकार आणि समाज यांचा समन्वय अत्यावश्यक असतो. मात्र वास्तवात असे दिसते की, अनेक दीर्घकालीन समस्या या केवळ चर्चेपुरत्याच मर्यादित राहतात आणि त्यांच्या मुळाशी जाऊन ठोस उपाययोजना करण्यात सातत्याचा अभाव राहतो. परिणामी, कुपोषण आणि बालमृत्यूसारख्या गंभीर समस्या आजही महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याच्या मानगुटीवर बसून राहिल्या आहेत.

# खरीप हंगामात युरिया, डीएपी खतांचा साठा आरक्षित ठेवा !

## राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचा आढावा बैठकीत आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**


खरीप हंगाम २०२६ करिता युरिया व डीएपी खतांचा आरक्षित साठा एप्रिल व मे महिन्यात तयार ठेवावा करावा यासाठी कृषी विभागाने काटेकोर नियोजन करावे. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत खतांची कमतरता भासणार नाही याची दक्षता घ्यावी .कोणत्याही कंपनीने किंवा विक्रेत्याने खतांसोबत इतर उत्पादने घेण्याची सक्ती करू नये असे निर्देश कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर राज्यातील खतांची उपलब्धता आणि नियोजनाचा आढावा घेण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली.यावेळी कृषि विभागाचे सचिव परिमल सिंह, संचालक कृषी सुनिल सी. बोरकर यासह विविध खत कंपन्याचे अधिकारी बैठकीला उपस्थित होते.




कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, खत उत्पादक व पुरवठादार कंपन्यांनी खते उपलब्ध होण्यापूर्वी कृषी विकास अधिकारी यांचेकडून तालुकानिहाय पुरवठ्याचे नियोजन प्राप्त करून घ्यावे व त्यानुसार विक्रेत्यांना वाटप करावे. खत पुरवठा कंपन्यांनी घाऊक विक्रेत्यांकडे खताचा साठा शिल्लक राहणार नाही याची दक्षता घेऊन थेट अथवा घाऊक विक्रेत्यामार्फत किरकोळ खत विक्रेत्यांना खत पुरवठा करण्यास प्राधान्य द्यावे. घाऊक विक्रेत्यांना ज्या जिल्ह्यासाठी खत आवंटन दिले आहे त्या त्यांना जिल्ह्याबाहेर युरिया व डीएपी खताची विक्री करता येणार नाही. ज्या विक्रेत्यांना खत नियंत्रण समिती प्रणालीवर २० मे टन किंवा जास्त खत साठा शिल्लक आहे अशा खत विक्रेत्यांना नवीन खत पुरवठाकरून नये. खतांची विक्री पॉस मशीनवर रियल टाईमवर करावी. पुढे बोलताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, युध्दजन्य परिस्थीतील खतांच्या पुरवठ्यावर परिणाम होवू नये यासाठी कृषि विभागाकडून ◀◀ पान २ वर

# राज्यात अवकाळी पावसाचा तडाखा!



**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या २४ तासांपासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस आणि गारपिटीने जोरदार हजेरी लावली असून मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना मोठा फटका बसला आहे. पुढील चार दिवसही अशाच प्रतिकूल हवामानाचा इशारा देत हवामान विभागाने हाय अलर्ट जारी केला आहे.

धाराशिव, बीड आणि लातूर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून ताशी ५० ते ६० किमी वेगाने वारे, विजांचा कडकडाट आणि गारपिटीची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. जळगाव, नाशिक, पुणे, नगर, सातारा, सांगली, सोलापूर, परभणी, हिंगोली, जालना आणि संभाजीनगर या जिल्ह्यांनाही वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

या अवकाळी पावसामुळे गहू, हरभरा, मका, ज्वारी, बाजरी, कांदा बियाणे तसेच आंबा आणि हळद पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काढणीसाठी तयार असलेली पिके उद्ध्वस्त ◀◀ पान २ वर

# जालन्यात भरधाव ट्रकने सात महिला मजुरांना चिरडलं

**जालना । शिवाजी मस्के**

जालना जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर आज बुधवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अत्यंत दुर्दैवी आणि भीषण अपघाताची घटना घडली आहे. जालन्यातील कडवंची शिवारात हा भीषण अपघात झाला असून, या अपघातात ७ महिला मजुरांचा जागीच मृत्यू झाला तर चार महिला गंभीर जखमी झाल्या असून जखमींना जिल्हा रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरहून मुंबईच्या दिशेने वेगाने जाणाऱ्या ट्रकने महामार्गावर काम करत असलेल्या महिला मजुरांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की काही महिला मजूर ट्रकखाली चिरडल्या गेल्या आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातानंतर घटनास्थळी हाहाकार माजला होता. अपघाताची माहिती मिळताच तालुका जालना पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी पंचनामा आणि पुढील तपासाची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच स्थानिक नागरिकांनीही तत्परता दाखवत मदतकार्य हाती घेतले आणि जखमींना रुग्णालयात हलवण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे समृद्धी महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या अपघातामध्ये अल्काबाई दादाराव आदमाने–निधोना, लक्ष्मीबाई संतोष मदन–केळीगव्हाण, मिना परमेश्वर आदमाने–निधोना, कांचनबाई प्रकाश (पान २ वर)





# पक्षाच्या घटनेत बदल, तटकरे–पटेलांच्या स्पष्टीकरणावर सुनेत्रा पवार असमाधानी

**मुंबई । प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या निधनानंतर १६ फेब्रुवारी रोजी प्रफुल्ल पटेल , सुनील तटकरे आणि ब्रिजमोहन श्रीवास्तव यांच्या सह्यांचे एक पत्र निवडणूक आयोगाला देऊन पक्षाचे सर्व अधिकार प्रफुल पटेल यांच्याकडे देण्याचा घाट घालण्यात आला होता, असा आरोप करण्यात आला होता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संविधानातील या बदलाबाबत आता प्रदेशाध्यक्ष







सुनील तटकरे आणि कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्याकडे स्पष्टीकरण दिल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, सुनेत्रा पवार या स्पष्टीकरणावर असमाधानी असल्याची माहिती ◀◀ पान २ वर

# पवित्र पोर्टलशिवाय झालेल्या शिक्षक भरतीची होणार चौकशी

**मुंबई । प्रतिनिधी**

## शालेय शिक्षण विभागाचा निर्णय

राज्यात पवित्र पोर्टलशिवाय करण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेतील सर्व नियुक्त्यांची सखोल चौकशी करण्याचा निर्णय आता शालेय शिक्षण विभागाकडून घेण्यात आला आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशाचा आधार घेत शासन निर्णय जारी केला आहे. राज्यभरातील अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अनियमित शिक्षकांच्या भरतींची चौकशी केली जाणार आहे.

शिक्षक भरती प्रक्रिया पारदर्शक आणि गुणवत्ता आधारित व्हावी यासाठी २२ जून २०१७ पासून 'पवित्र' या ऑनलाईन प्रणालीद्वारेच भरती करणे बंधनकारक करण्यात आले होते. मात्र, काही खासगी व अनुदानित शाळांनी विविध कारणे देत ही प्रणाली न वापरता थेट भरती केल्याच्या घटना समोर आल्या. लॉगिन आयडी न मिळणे, प्रशासनाकडून वेळेत प्रतिसाद ◀◀ पान २ वर

# निर्दोष सुटकेनंतर थकीत वेतनाचा अधिकार नाही; हायकोर्टाचा निर्वाळा



**मुंबई । प्रतिनिधी**

फौजदारी खटल्यातून एखाद्या कर्मचाऱ्याची निर्दोष सुटका झाली म्हणजे त्याला निलंबन काळातील पूर्ण पगार आणि थकीत वेतन मिळण्याचा अधिकार प्राप्त होत नाही, असा महत्वपूर्ण निर्णय देत उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेच्या एका वैद्यकीय अधिकाऱ्याला दिलासा देण्यास नकार दिला.

फौजदारी खटल्यात निर्दोष सुटका झाल्याचे निदर्शनास आणून देत पालिका अधिकाऱ्याने थकीत वेतनावर दावा केला होता. लाच घेतल्याच्या आरोपावरून पालिका अधिकाऱ्याला १९८६ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ◀◀ पान २ वर

# गॅस सिलिंडर तब्बल १९५ रुपयांनी महागले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाचे पडसाद भारतात उमटत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी व्यावसायिक वापराच्या एलपीजी सिलिंडरच्या दरात १९५.५० रुपयांची मोठी वाढ केली आहे. मात्र, घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरचे दर स्थिर ठेवल्याने सर्वसामान्यांना तूर्तास दिलासा मिळाला आहे.

तेल कंपन्यांनी जाहीर केलेल्या नवीन दरवाढीनुसार, दिल्लीत १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरची किंमत आता २,०७८.५० रुपयांवर पोहोचली आहे. ◀◀ पान २ वर

# लाडक्या बहिणींना दिलासा!

## ३० एप्रिलपर्यंत करा इ केवायसी

**मुंबई । प्रतिनिधी**

लाडकी बहीण योजनेसाठी ई–केवायसी करण्याची शेवटची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी म्हणजे काल संपली होती. पण आता लाडक्या बहिणींसाठी पुन्हा एकदा एक मोठी बातमी आहे. लाडक्या बहिणींना आता आपली ई–केवायसी करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ई–केवायसीची शेवटची मुदत ३० एप्रिल २०२६ आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना दिलासा मिळाला आहे. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री



अदिती तटकरे यांनी याबाबत माहिती दिली आहे.

विधानसभा निवडणुकीआधी सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या लाडकी बहीण ◀◀ पान २ वर

# महाडीबीटी अनुदानासाठी नवा नियम लागू!

## १ एप्रिलपासून 'आधार बेस' पद्धतीनेच थेट खात्यात जमा होणार अनुदान

**पुणे । प्रतिनिधी**

महाडीबीटी अनुदानासाठी 'आधार बेस' पद्धत अनिवार्य; शेतकऱ्यांनी खाते लिंक करणे गरजेचेआहे. गेल्या अनेक दिवसांपासून महाडीबीटी पोर्टलवरील विविध कृषी योजनांच्या अनुदानाची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यातील कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अनुदान वितरण प्रक्रियेत मोठा बदल करण्यात आला असून, १ एप्रिल २०२६ पासून 'आधार बेस पेमेंट' पद्धत अनिवार्य करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून विविध योजनांसाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे अर्ज मागविले जातात. त्यानंतर केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या निधी व लक्षांकानुसार लाभार्थ्यांची निवड केली जाते. निवड झालेल्या शेतकऱ्यांनी आवश्यक साहित्य किंवा यंत्रसामग्री खरेदी केल्यानंतर अनुदान त्यांच्या खात्यात जमा केले जाते.

यापूर्वी या अनुदानाची रक्कम 'अकाऊंट बेस' तसेच 'आधार बेस' अशा दोन्ही पद्धतींनी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जात होती. मात्र, आता केंद्र शासनाच्या सूचनांनुसार 'अकाऊंट बेस' पद्धत पूर्णपणे बंद करण्यात येत असून, केवळ 'आधार बेस पेमेंट' प्रणालीच लागू राहणार आहे. या निर्णयानुसार, १ एप्रिल २०२६ पासून महाडीबीटी पोर्टलवरील सर्व योजनांचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या आधारशी संलग्न असलेल्या बँक खात्यातच जमा केले जाणार आहे. त्यामुळे अर्ज करताना दिलेल्या ◀◀ पान २ वर

# जन्मदात्या बापानेच लेकीला संपवलं

**पाथर्डी । प्रतिनिधी**

अहिल्यानगरमधील पाथर्डी तालुक्यातील एरंडगाव समसूद येथे आज बुधवारी घडलेल्या एका थरकाप उडवणाऱ्या घटनेनं संपूर्ण परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. पैशांच्या वादातून एका वृद्ध बापानेच संतापाच्या भरात स्वतःच्या मुलीवर कुऱ्हाडीने हल्ला करून तिची निर्घृण हत्या केली. तर तिला वाचवण्यासाठी धावलेल्या दुसऱ्या मुलीलाही मारहाण करून जखमी केलं. या अमानुष प्रकारामुळे गावात भीती आणि संतापाचं वातावरण पसरलं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भारती ही तिची मोठी बहीण मिर्चाना हिच्यासह वडील जयराम भोसले यांच्या एरंडगाव येथील घरी भेटीसाठी आली होती. ऊसतोड कामासाठी ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### अटारी–वाघा सीमेवर रिट्रीटची वेळ बदलली

अमृतसर : येथील भारत–पाकिस्तान अटारी सीमेवर होणाऱ्या प्रसिद्ध रिट्रीट सेरेमनीच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. अटारी–वाघा सीमेवर दररोज होणारी ही देशभक्तीने भरलेली सेरेमनी पाहण्यासाठी मोठ्या संख्येने लोक येतात. नवीन निर्णयानुसार, आता रिट्रीट सेरेमनी संध्याकाळी ५:३० वाजता सुरू होऊन ६:०० वाजेपर्यंत चालेल. यापूर्वी रिट्रीट सेरेमनी ५ वाजता सुरू होऊन ५:३० वाजता संपत होती. हवामान आणि दिवसाच्या कमी–जास्त होणाऱ्या प्रकाशाचा विचार करून प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, प्रेक्षकांना चांगला अनुभव देण्यासाठी आणि सुरक्षा व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी वेळेत हा बदल आवश्यक होता.

### शिवव्याख्याते बारूळकर महाराजांचे अपघाती निधन

नांदेड : नांदेड जिल्ह्यातील प्रसिद्ध शिवव्याख्याते ह.भ.प. मधुकर महाराज बारूळकर यांचे काल दुपारी दुचाकी आणि टिप्परच्या भीषण अपघातात निधन झाले. नांदेड शहरातील ढवळे कॉर्नर परिसरात ही हृदयद्रावक घटना घडली. नांदेड येथे शिव कुटुंब मेळावा आयोजित करण्यात आला होता. हा मेळावा झाल्यानंतर महाराज आपल्या दुचाकीने स्वगावी बारूळकडे निघाले होते. यावेळी ढवळे कॉर्नर येथे आले असता पाठीमागून येणाऱ्या भरधाव टिप्परने त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की महाराजांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या आकस्मिक जाण्याने सामाजिक आणि प्रबोधन क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. तसेच संपूर्ण जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

### लॉकडाऊनच्या अफवा पसरवल्यास गुन्हा

नवी दिल्ली : सोशल मीडिया आणि व्हॉट्सॲपवर १ एप्रिल रोजी 'वॉर लॉकडाउन' नोटीस व्हायरल झाली, ज्यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली. अशोकचक्र आणि मंत्रालय यांसारख्या चिन्हांसह तयार केलेली ही नोटीस पहिल्या दृष्टीक्षेपात अधिकृत वाटली, परंतु नंतर ती एप्रिल फूलचा विनोद असल्याचे निष्पन्न झाले.केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर लॉकडाउनच्या अफवा पूर्णपणे निराधार असल्याचे सांगितले. त्यांनी सांगितले की, सरकारच्या स्तरावर कोणत्याही प्रकारच्या लॉकडाउन प्रस्तावावर विचार केला जात नाही. त्यांनी लोकांना शांतता राखण्याचे आणि अफवा न पसरवण्याचे आवाहन केले.

### दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीमध्ये भरीव वाढ

मुंबई : राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे शिशुवर्ग ते आठवी, नववी ते दहावी तसेच अकरावी व बारावीत शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत भरीव वाढ होणार आहे.

महाराष्ट्राच्या व्हिजन डॉक्यूमेंटमध्ये शिक्षण आणि कौशल्य विकास वृध्दिंगत करणे असा मुद्दा समाविष्ट आहे. या उद्दिष्टाला अनुसरून दिव्यांगांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्यात येत आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

**बीड, दि.३० मार्च २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: २५६.०० क्विंटल** | | |
| १,९२३ | २,६०१ | २,२४४ |
| **ज्वारी/हायब्रिड: १६१.५० क्विंटल** | | |
| १,७०० | ४,२०० | ३,२१७ |
| **मका/लोकल: ३.५० क्विंटल** | | |
| १,५०० | १,५०० | १,५०० |
| **तूर : १.०० क्विंटल** | | |
| ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| **उडीद : २.५० क्विंटल** | | |
| ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| **बाजरी:५५.०० क्विंटल** | | |
| २,४०० | २,७५० | २,६३९ |
| **मुग: २.०० क्विंटल** | | |
| ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| **सोयाबीन: १८.५० क्विंटल** | | |
| ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| **हरभरा: २१.०० क्विंटल** | | |
| ४,९०० | ५,०५० | ४,९९८ |

cmyk

## अग्रलेख

# कुपोषणाच्या विळख्यातून मुक्ती ; समन्वयच एकमेव उपाय

समाजातील कोणतीही मोठी समस्या ही केवळ सरकारच्या धोरणांनी किंवा समाजाच्या प्रयत्नांनी स्वतंत्रपणे सुटत नाही. त्या समस्येवर प्रभावी आणि कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सरकार आणि समाज यांचा समन्वय अत्यावश्यक असतो. मात्र वास्तवात असे दिसते की, अनेक दीर्घकालीन समस्या या केवळ चर्चेपुरत्याच मर्यादित राहतात आणि त्यांच्या मुळाशी जाऊन ठोस उपाययोजना करण्यात सातत्याचा अभाव राहतो. परिणामी, कुपोषण आणि बालमृत्यूसारख्या गंभीर समस्या आजही महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याच्या मानगुटीवर बसून राहिल्या आहेत.

गेल्या तीन दशकांपासून विदर्भातील मेळघाट परिसर कुपोषणाच्या छायेत आहे. अनेक योजना, न्यायालयीन आदेश, सामाजिक संस्थांचे प्रयत्नया सगळ्यांनंतरही परिस्थितीत अपेक्षित बदल दिसत नाही. ही बाब केवळ प्रशासनाच्या अपयशाची नाही, तर संपूर्ण व्यवस्थेतील त्रुटींचे द्योतक आहे. कुपोषण ही फक्त आरोग्याची समस्या नाही; ती आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक असमानतेची परिणती आहे. त्यामुळे तिचा सामना करण्यासाठी सर्वसमावेशक दृष्टीकोन आवश्यक आहे.

आज परिस्थिती अधिक चिंताजनक यासाठी आहे की, ही समस्या केवळ दुर्गम आदिवासी भागापुरती मर्यादित राहिलेली नाही. मुंबईसारख्या महानगरातील झोपडपट्ट्यांमध्येही कुपोषणाने पाय रोवले आहेत. स्वच्छतेचा अभाव, सुरक्षित पिण्याच्या पाण्याची कमतरता, स्थलांतरितांचे अस्थिर जीवनमान आणि अपुरी उत्पन्नसाधने या घटकांमुळे शहरी कुपोषणाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. म्हणजेच, कुपोषण ही ग्रामीण–शहरी दोन्ही पातळ्यांवरची गंभीर सामाजिक समस्या बनली आहे.

न्यायालयाने वेळोवेळी या प्रश्नाकडे लक्ष वेधूनही त्यात अपेक्षित सुधारणा झालेली नाही, ही खंत अधिक वेदनादायी आहे. यावरून स्पष्ट होते की, धोरणे तयार करणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे यात मोठी दरी आहे. सरकारी योजना कागदावर प्रभावी दिसतात, परंतु त्या गरजूंपर्यंत पोहोचण्यात अपयशी ठरतात. अनेकदा अपात्र लाभार्थी योजनांचा फायदा घेतात, तर खरोखर गरजूंना त्यापासून वंचित राहावे लागते. ही व्यवस्थेतील गळती थांबवणे अत्यंत गरजेचे आहे.

यासाठी सर्वप्रथम लाभार्थी निवड प्रक्रियेत पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा अधिक वापर आवश्यक आहे. ई–केवायसीसारख्या उपाययोजनांमुळे अपात्र लाभार्थी ओळखणे शक्य झाले आहे, परंतु अशा पद्धतींचा व्यापक आणि सातत्यपूर्ण वापर करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर स्थानिक पातळीवर जबाबदारी निश्चित करणे आणि कामगिरीचे नियमित मूल्यमापन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

दुसरीकडे, समाजाची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. अंधश्रद्धा, चुकीच्या समजुती आणि आरोग्यविषयक अज्ञान यामुळे अनेक वेळा समस्या अधिक तीव्र होते. त्यामुळे जनजागृती मोहिमा प्रभावीपणे राबवणे, स्थानिक स्वयंसेवी संस्थांना बळकटी देणे आणि लोकसहभाग वाढवणे ही काळाची गरज आहे. कुपोषणाविरुद्धची लढाई ही केवळ शासकीय यंत्रणांची नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, ही जाणीव समाजात रुजवावी लागेल.

शेतकरी समस्येप्रमाणेच कुपोषणाच्या प्रश्नातही 'तात्पुरत्या उपायां'पेक्षा 'शाश्वत उपायां'वर भर देणे आवश्यक आहे. केवळ आर्थिक मदत किंवा अन्नधान्य पुरवठा करून समस्या सुटत नाही. रोजगारनिर्मिती, पोषणमूल्यांबाबत शिक्षण, आरोग्य सुविधा आणि स्वच्छतेची उपलब्धता यांचा एकत्रित विचार करून धोरणे आखावी लागतील.

आज गरज आहे ती समस्यांच्या प्राधान्यक्रमाचे पुनर्मूल्यांकन करण्याची. नव्या समस्यांच्या गर्दीत जुन्या समस्यांकडे दुर्लक्ष होणे ही धोकादायक प्रवृत्ती आहे. कुपोषण आणि बालमृत्यू यांसारख्या मूलभूत प्रश्नांना सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. कारण ही समस्या केवळ वर्तमानाची नाही, तर भविष्यातील पिढ्यांच्या आरोग्याशी आणि देशाच्या विकासाशी निगडित आहे.

सरकारची सजगता आणि समाजाचा सहभाग या दोन घटकांचा योग्य मेळ घातल्यासच कुपोषणाच्या विळख्यातून मुक्ती शक्य आहे. अन्यथा, ही समस्या पुढील अनेक दशकांपर्यंत तशीच रेंगाळत राहील आणि प्रगत महाराष्ट्राच्या प्रगतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करत राहील.

# ईद मिलन समारोह संपन्न

जालना । प्रतिनिधी

३१ मार्च रोजी देशसेवा फाउंडेशन व पीस फाउंडेशन तर्फ ईदमिलन समारोह आयोजित करण्यात आला होता



या कार्यक्रमात जालना चे पहिले महापौर श्रीमती वंदना ताई मगरे तसेच उपमाहापोर मा श्री राजेश राउत सभापती मा श्री सुजीत जी जोगस माजी उपनारअध्यश मा श्री नंदकिशोर जि जांगडे नगरसेवक संतोष माधोवले सगीर भाई पहेलवान अतीक खान साहब पिस फाउणडेशन चे अफसर मिर्झा बेग मुशताक भाई विकास कुमार बागडी जफर खान नजीर भाई जफर मिर्झा चेतन जांगडे युवराज शिरसाठ अंबादास पाचफुले ईल्लु पहेलवान आदी मान्यवर उपस्थित होते देशसेवा फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शेख जावेद भाई यांनी सर्वाना ईद ची शुभेच्छा दिल्या तर आयोज क अफसर मिर्झा बेग यांनी सर्वाचे आभार मानले .

# चिंचाळा येथे वादळी वाऱ्याने शेतकऱ्यांच्या सोलार पॅनलचे नुकसान

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात गेली दोन दिवस झाले वादळी वारे मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्याच्या रबी पिका बरोबर चिंचाळा तालुका वडवणी जिल्हा बीड येथील शेतकरी शिवाजी काशिनाथ मोरे यांच्या शेतातील सोलार पॅनलचे नुकसान झाले आहे. ते संबंधित कंपनीने तात्काळ दुरुस्त करून देण्याची मागणी शेतकऱ्यांने केली आहे. सविस्तर वृत्त असे की हवामान खात्याच्या अंदाजानुसार गेली दोन दिवस झाले तालुक्यात वादळी वारे मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावली आहे. यामध्ये शेतकऱ्यांच्या शेतातील गहू, ज्वारी, बाजरी, मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर



चिंचोळा तालुका वडवणी जिल्हा बीड येथील शेतकरी शिवाजी काशिनाथ मोरे यांच्या चिंचाळा शिवारातील गट नंबर २२५ मधील बोअवेल पाणी सिंचनासाठी आसलेले ५ एच पी चे सोलार पॅनलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ते संबंधित कंपनीने तात्काळ भरपाई द्यावी जेणेकरून शेतकऱ्याच्या रब्बी पिकाचे नुकसान होणार नाही.

## पान ६ वरून...

### महेश साखर कारखान्यातील

ही चोरी काही हजारांची नसून थेट कोट्यवधी रुपयांच्या घरात आहे.विशेष म्हणजे, या चोरीतील संशयितांची नावे आता समोर आली आहेत. त्यांच्यावर लवकरच पोलिसांत कठोर कारवाईसाठी अधिकृत तक्रार दाखल केली जाणार आहे.

या मोठ्या चोरीमुळे कारखान्याच्या उभारणीच्या गतीवर थोडाफार परिणाम होण्याची शक्यता असली,तरी नियोजित वेळेतच प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रशासन आणि सर्व संबंधित यंत्रणा शर्थीचे प्रयत्न करत असल्याचे माजी आ. धोंडे यांनी स्पष्ट केले.दरम्यान, एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि अत्यंत जड असलेली मशिनरी चोरीला गेल्याने कारखान्याच्या अडचणी वाढल्या आहेत.या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कठोर कारवाई व्हावी अशी मागणी संचालक मंडळ, शेतकरी आणि नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

### धुनकवाडच्या विकासासाठी

यांच्याकडे निधीची मागणी करण्यात आल्याचे सांगितले.

दरम्यान, सरपंच भागवत गव्हाणे यांच्या निवासस्थानी त्यांच्या मातोश्रींच्या हस्ते नवनाथ बन यांचे औक्षण करण्यात आले. या प्रसंगामुळे कार्यक्रमाला पारंपरिक व भावनिक रंग चढला.

या कार्यक्रमास भाजपाचे धारूर तालुकाध्यक्ष संदीप काचगुंडे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष ज्ञानोबा बडे, दादासाहेब घोळवे, बाळराजे लगड, तात्या धुमाळ, भाजप युवा मोर्चाचे वडवणी तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे, धनगर समाजाचे नेते दत्ता वाकसे, अतुल मस्के, पत्रकार अविनाश मुजमुले, देवडीचे उपसरपंच महादेव पुरी, माजी सरपंच अभिमान यादव, अरुण यादव, माजी उपसरपंच दत्ता यादव, ज्ञानेश्वर यादव, गोरख यादव, रुक्षराज कागणे, ज्ञानदेव कागणे, श्रीराम महाराज यादव, सच्चिदानंद यादव, बंकटी गोरे, मधुकर यादव, भागवत यादव, प्रकाश यादव, कचरू यादव, भिकाजी रोटे, हरीराम यादव आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सरपंच भागवत गव्हाणे यांनी केले, सूत्रसंचालन पत्रकार जगदीश गोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन बहादूर कुलकर्णी यांनी मानले.

### बीडमध्ये अल्पवयीन मुलाकडून

परळी परिसरातील वेगवेगळ्या ठिकाणांहून तीन दुचाकी चोरल्याची कबुली दिली. त्याच्याकडून एक स्कूटी आणि दोन मोटारसायकल अशा एकूण तीन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. या दुचाकींची पडताळणी केली असता खालील पोलीस ठाण्यांमधील चोरीचे गुन्हे उघड झाले आहेत:

परळी शहर पोलीस स्टेशन: गु.र.नं. १८/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं.

संभाजीनगर पोलीस ठाणे: गु.र.नं. ६९/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं.

पोलीस पथकाची कामगिरी

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत पोउपनि सुशांत सुतळे, विष्णू सानप, रामचंद्र केकान, गोविंद भताने, सचिन आंधळे, अतुल हराळे, मारोती कांबळे, दिलीप गिते आणि विकास राठोड यांचा समावेश होता. पुढील तपासासाठी सदर विधीसंघर्ष बालकाला आणि जप्त केलेल्या दुचाकींना परळी शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

### धनश्री पतसंस्थेचा ६०

जपत शहरात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत. विशेषतः वृक्षलागवड व संवर्धनाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणातही संस्थेने उल्लेखनीय योगदान दिले असल्याचे धोंडे यांनी सांगितले.

''गेल्या सहावीस वर्षांपासून आम्ही ३१ मार्चलाच ताळेबंद सादर करण्याची परंपरा जपली आहे.आमच्या संस्थेची थकबाकी २%, एनपीए ३%,सिडी रेशो ६८% तर सीआरएआर २८% असा आहे.या संस्थेच्या वाटचालीस ठेवीदार, कर्जदार व सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाच्या बळावरच संस्थेची ही प्रगती शक्य झाली.''

–जितेंद्र शिंदे,सचिव,धनश्री पतसंस्था, आष्टी

### भाजपचा वटवृक्ष करण्यासाठी

प्रत्येक ठिकाणी मुंडे साहेबांसारखे व्यक्ती तयार झाले आणि पक्षाचा वटवृक्ष झाले. आपल्या पक्षाला एक इतिहास आहे, पक्षात विचार, संस्कार आणि नीतीला फार महत्व आहे. 'सत्ता हमारा ध्येय नही, संघर्ष हमारा नारा' आहे या भूमिकेतून आपल्या नेत्यांनी काम केल आहे. भाजप हा देशात एकमेव पक्ष आहे जो भारत मातेचे पूजन करतो. सर्वांना सोबत घेऊन देशभक्तीचे बीज भाजपने रोवले असल्याचे ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

मतदार प्रक्रिया जोमाने राबवा

आपल्या पक्षाने अनेक चढउतार पाहिले आहेत. अनेकांना सोबत घेऊन पक्ष काम करतो आहे. देशात आणि अनेक राज्यात आपली सत्ता आहे, प्रधानमंत्री मोदीजी हे तीनवेळा प्रधानमंत्री झाले.परंतु सत्ता हे पक्षाचे साध्य कधीच नव्हते. सामान्य लोकांची सेवा करणे, देशप्रेमाची भावना वाढीस लावणे हे पक्षाचे ध्येय आहे. आपल्या पक्षात शिस्तीला महत्व आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी देशासाठी, पक्षासाठी बलिदान देऊन सर्वस्व अर्पण केले.

पक्षाचे विचार, कार्य तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे हे आपले ध्येय ठेवा. संघटनेप्रति प्रेम आणि आदर ठेवा.तळमळीने काम करा, प्रधानमंत्री स्वतः जीवतोड मेहनत घेत आहेत. मी स्वतः तहानभूक विसरून काम करत आहे. आता मतदार नोंदणी उपक्रम घरोघरी जावून राबवा, प्रत्येकाची नोंदणी करा, बीएलओ घरी येतील तेंव्हा आपले आणि परिवाराचे नाव नोंदवा हे काम बूथ प्रमुख म्हणून आपणच करू शकता असे आवाहन त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले.

# हॉर्मुझ' खुली होत नाही, तोपर्यंत हल्ले सुरूच राहणार : ट्रम्प यांचा इशारा

वॉशिंग्टन । वृत्तसंस्था

जोपर्यंत हॉर्मुझची सामुद्रधुनी ( ) जागतिक जहाजांच्या वाहतुकीसाठी पुन्हा उघडली जात नाही आणि ती ''मुक्त आणि सुरक्षित'' राहत नाही, तोपर्यंत अमेरिका युद्धविरामाचा विचार करणार नाही, असे स्पष्ट संकेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले आहेत. महत्त्वाच्या तेल व्यापार मार्गावरील सागरी प्रवेशाशी त्यांनी युद्धविरामाची अट जोडली आहे.

तोपर्यंत अमेरिका कोणताही विचार करणार नाही.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की, इराणच्या नवीन नेतृत्वाने युद्धविरामासाठी संपर्क साधला आहे. मात्र, जोपर्यंत धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून जागतिक जहाजांची वाहतूक पूर्ववत होत नाही, तोपर्यंत अमेरिका यावर कोणताही विचार करणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे. ट्रुथ सोशल'वर दिलेल्या निवेदनात ट्रम्प यांनी इराणच्या कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याचे नाव घेतले नाही, परंतु संबंधित व्यक्तीचे वर्णन पूर्वीच्या नेतृत्त्वापेक्षा खूपच कमी कट्टर आणि अधिक बुद्धिमान, असे केले आहे. मात्र, अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी हे स्पष्ट केले की, ''जेव्हा हॉर्मुझची सामुद्रधुनी खुली, मुक्त आणि स्पष्ट असेल, तेव्हाच आम्ही विचार करू.''तोपर्यंत लष्करी कारवाया सुरूच राहतील, असा पुनरुच्चार ट्रम्प यांनी केला. ''तोपर्यंत आम्ही इराणचा नायनाट करत राहू, किंवा लोक म्हणतात त्याप्रमाणे त्यांना पुन्हा पाषाण युगात धाडू, असे त्यांनी म्हटले आहे. हॉर्मुझची सामुद्रधुनी हा एक अरुंद जलमार्ग आहे, जिथून जगातील तेलाचा मोठा पुरवठा होतो. अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या हल्ल्यांनंतर इराणने या मार्गावरील वाहतूक रोखण्याचा प्रयत्न केल्यामुळे हा भाग सध्या युद्धाचे मुख्य केंद्र बनला आहे.

## पान १ वरून...

### खरीप हंगामात युरिया

काळजी घेण्यात येत आहे. रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणे, नॅनो खतांचा वापर वाढवणे. शेतकऱ्यांना हिरवळीच्या खतांचा वापर करण्यास प्रोत्साहित केले जाईल, ज्यामुळे जमिनीतील सूक्ष्मजीवांची क्रियाशीलता वाढून जमिनीची सुपीकता सुधारेल.बीजप्रक्रियेसाठी राईझोबियम, अझोटोबॅक्टर आणि पीएसबी यांसारख्या जैविक खतांचा वापर वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. नॅनो खते मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने, ड्रोनच्या सहाय्याने त्यांच्या फवारणीस प्रोत्साहन देण्यात येईल.फवारणी शिफारस: पिकांमध्ये नत्र () व स्फुरद () ची कमतरता आढळल्यास १% युरिया व १–२% डीएपी द्रावणाची फवारणी करण्याबाबत शेतक–यांना आवाहन करण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या 'मृदा आरोग्य पत्रिका' अभियानांतर्गत शिफारस केल्यानुसार खतांची मात्रा देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. राज्यात पारंपरिक कृषी विकास योजना आणि राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत सुमारे १.८१ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे रासायनिक खतांच्या खर्चात मोठी बचत होणार आहे.

### राज्यात अवकाळी

झाल्याने शेतकरी वर्गात तीव्र संताप आणि नैराश्याचे वातावरण आहे. जळगाव, भुसावळ, एरंडोल, धरणगाव, मुक्ताईनगर तसेच नांदेड जिल्ह्यातील भोकर, अर्धापूर, उमरी आणि धर्माबाद तालुक्यांना मोठा फटका बसला आहे. अर्धापूरमध्ये वीज पडून एका शेतकऱ्याची गाय दगावल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, विदर्भ ते दक्षिण भारतापर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याने राज्यभर पावसाचे वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे पुढील काही दिवस अवकाळी पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून तात्काळ पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. प्रशासनाने नदीकाठच्या गावांना सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत.

### जालन्यात भरधाव ट्रकने

आदमाने–निधोना, ताराबाई गहेनाजी चौधरी–केळीगव्हान, कडुबाई रामदास मदन–केलीगव्हान, सुमनबाई कचरु आदमाने–निधोणा या सात महिलांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य चार महिला मजूर गंभीररित्या जखमी झाल्या. महामार्गावर काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत का? असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, या अपघाताबाबत अधिकृत माहिती मिळवण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू असून, मृतांचा आकडा आणि ओळख पटवण्याचं काम सुरू आहे. या घटनेवर माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनीही प्रतिक्रिया देत दु:ख व्यक्त केलं आहे. पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, अपघाताचं नेमकं कारण लवकरच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच नातेवाईकांपैकी कुणी रुग्णालयात पोहोचलं तर कुणी अपघातस्थळी पोहोचले. तिथलं दृश्य पाहून लेकरांनी एकच आक्रोश केला. दरम्यान, २९ जून २०२४ रोजी देखील असाच एक भीषण अपघात याच समृद्धी महामार्गावर झाला होता. यात देखील सहा जण ठार तर तीन जण जखमी झाले होते. मृतांमध्ये तीन जण मुंबईमधील मालडचे तर अन्य तिघे बुलढाणा जिल्ह्यातील रहिवासी होते.

### पक्षाच्या घटनेत बदल

समोर आली आहे. त्यामुळे आगामी काळात सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संविधानात बदल करण्यावरुन पक्षात दोन तट पडल्याचे सांगितले जाते. या पार्श्वभूमीवर प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांनी सुनेत्रा पवार यांच्याकडे आपली बाजू मांडली. पक्षाच्या घटनेत बदल करून अध्यक्षांसोबत कार्याध्यक्षकडे अधिकार द्यावेत याबाबतचे पत्र पटेल, तटकरे यांनी निवडणूक आयोगाला दिले होते. कार्याध्यक्ष म्हणून प्रफुल्ल पटेल यांच्याकडे अधिकार द्यावेत अशा आशयाचे पत्र देण्यात आले होते. या पत्रानंतर सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून सर्व पत्रव्यवहार अमान्य समजून दुर्लक्षित करावेत, असे पत्र निवडणूक आयोगाला दिले होते. या घडामोडीनंतर पक्षात बरेच वादंग झाले. यानंतर तटकरे, प्रफुल्ल पटेल यांच्याकडून सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांना स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, तटकरे आणि पटेल यांच्या स्पष्टीकरणावर सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार समाधानी नसल्याची माहिती आहे. सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल यांनी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी पत्रव्यवहार केल्यानंतर १० मार्च रोजी सुनेत्रा पवारांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून तटकरे,पटेलांनी पाठवलेले पत्र ग्राह्य धरू नका म्हणून सांगितले. तटकरे, पटेल यांच्या पत्रानंतर दोन्ही नेत्यांबाबत पक्षात नकारात्मक आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले.

### पवित्र पोर्टलशिवाय झालेल्या

न मिळणे यांसारखी कारणे पुढे करत संस्थांनी स्वतःच्या स्तरावर नियुक्त्या केल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने अशा प्रकरणांबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत, पवित्र पोर्टलशिवाय झालेल्या भरतींचा सविस्तर अहवाल तयार करण्याचे आदेश शासनाला दिले होते. या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारने प्रत्येक शिक्षण विभागात विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय उच्चस्तरीय समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. या समित्यांमध्ये संबंधित विभागातील दोन अधिकारी सदस्य म्हणून असतील आणि त्यांची निवड करण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्यात आला आहे.

### लाडक्या बहिणींना

योजनेच्या माध्यमातून गरजू महिलांच्या बँक खात्यावर प्रत्येक महिन्याला १५०० रुपये निधी जमा करण्यात येतो. या लोकप्रिय योजनेचा फायदा महायुती सरकारला चांगल्या पद्धतीने झाला, जे आता आपल्यासमोर आहे. मात्र, या योजनेत बोगस लाभार्थीसुद्धा याचा फायदा घेत असल्याचं सरकारच्या निदर्शनास आलं. फक्त आणि फक्त अडीच लाखांचे उत्पन्न असणाऱ्यांसाठीच असलेल्या या योजनेत भल्याभल्या सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी देखील लाभ घेतल्याचं समोर आलं. या चुकीच्या प्रकारांवर अंकुश लावण्यासाठी ई–केवायसीची संकल्पना अंमलात आणली गेली, आणि बोगस लाभार्थ्यांना या योजनेतून गेट–आऊट करण्याची योजना आखली. त्यानुसार ई–केवायसीसाठी ३१ डिसेंबर २०२५ची शेवटची मुदत देण्यात आली. मात्र, त्यादरम्यान देखील महिलांना अनेक अडचणींना सामोरं जावं लागलं. नेमकं त्याचवेळी या संकेतस्थळात तांत्रिक अडचणी येऊ लागल्या आणि बऱ्याच महिलांच्या ई–केवायसी करण्यापासून वंचित राहिल्या. तरीही १ कोटी ७० लाख महिलांना ई–केवायसी करण्यात यश आलं. मोठी बाब म्हणजे, अनेक महिलांनी कुटुंबातील व्यक्ती सरकारी नोकरीत आहे किंवा नाही यासाठी देण्यात आलेल्या पर्यायांतून चुकीचा पर्याय निवडल्याने अनेक महिलांचा १५०० रुपयांचा हफ्ता आपोआप बंद झाला. दरम्यान, अशा महिलांच्या तक्रारीनंतर किंवा ज्यांची ई–केवायसी राहिलीय, अशा महिलांसाठी पुन्हा ३१ मार्च २०२६ची मुदत देण्यात आली, ती मुदत देखील काल मंगळवारी संपली. मात्र, त्याचदरम्यान, आता पुन्हा ही मुदतवाढ करुन ३० एप्रिल २०२६ करण्यात आली आहे.

### जन्मदात्या बापानेच

दिलेल्या पैशांवरून कुटुंबात वादाला सुरुवात झाली. सुरुवातीला किरकोळ असलेला हा वाद हळूहळू तीव्र होत गेला आणि घरातील वातावरण तणावपूर्ण बनलं. संतापाच्या भरात जयराम भोसले यांनी घरातच असलेली कुऱ्हाड उचलली आणि कोणतीही तमा न बाळगता मिर्चाना हिच्यावर जीवघेणा वार केला. चेहऱ्यावर आणि मानेवर झालेल्या गंभीर जखमांमुळे मिर्चाना हिचा घटनास्थळीच मृत्यू झाला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या बहिणीला वाचवण्यासाठी भारती धावून आली असता आरोपीनं तिच्यावरही हल्ला करत मारहाण केली. या हल्ल्यात भारती जखमी झाली असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच शेवगाव पोलिसांचं पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झालं. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेत पंचनामा व इतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर आरोपी जयराम शंकर भोसले (वय ६५, रा. एरंडगाव) याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. या घटनेमुळे काही काळ गावात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. मात्र, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली.

### निर्दोष सुटकेनंतर थकीत

अटक केल्यानंतर त्यांना निलंबित करण्यात आले होते. १९९० मध्ये त्यांची निर्दोष सुटका झाली आणि त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्यात आले. मात्र, प्रशासनाने त्यांचा निलंबन काळ कर्तव्यावर असलेला काळ म्हणून ग्राह्य न धरता तो रजांमध्ये रूपांतरित केला. याच निर्णयाला अधिकाऱ्याने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.न्या. एस. एम. मोडक आणि न्या. संदीप मारणे यांच्या खंडपीठाने त्यांच्या याचिकेवर सुनावणी घेत निर्णय दिला की, पूर्ण पगार आणि भत्ते द्यायचे की नाही, हे ठरवण्याचा अधिकार संबंधित शिस्तपालन प्राधिकरणाकडे असतो. हा निर्णय प्रत्येक प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थितीनुसार घेतला जातो. फौजदारी खटला कर्मचाऱ्याच्या खासगी व्यवहारांशी संबंधित असेल आणि तो मालकाच्या सांगण्यावरून दाखल केलेला नसेल, तर त्या काळातील पगाराचा आर्थिक बोजा आस्थापनेवर टाकता येणार नाही. निलंबन काळातील वेतन हे त्या आस्थापनेच्या सेवा नियमांनुसार आणि प्राधिकरणाच्या विवेकबुद्धीनुसार दिले जाते, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### गॅस सिलिंडर तब्बल

यापूर्वी १ मार्च रोजी या सिलिंडरच्या दरात ११४.५ रुपयांची वाढ करण्यात आली होती. एका महिन्यात दुस–यांदा झालेली ही मोठी दरवाढ हॉटेल, उपाहारगृहे आणि केटरिंग व्यावसायिकांचे बजेट कोलमडवणारी ठरणार आहे. व्यावसायिक सिलिंडरचे दर कडाडले असले, तरी घरगुती वापराच्या (१४.२ किलो) सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. ७ मार्च रोजी घरगुती सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ झाली होती, त्यानंतर दिल्लीत याची किंमत ९१३ रुपये इतकी कायम आहे. दुसरीकडे, पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीही स्थिर आहेत. दिल्लीत पेट्रोल ९४.७२ रुपये, तर डिझेल ८७.६२ रुपये प्रति लिटर दराने मिळत आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. परिणामी, जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतीत सुमारे ५० टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियम यांसारख्या सरकारी कंपन्या दर महिन्याच्या १ तारखेला जागतिक कल आणि चलन विनिमय दराचा आढावा घेऊन एलपीजीच्या किमती निश्चित करतात.

### महाडीबीटी अनुदानासाठी

इतर बँक खात्यांचा विचार केला जाणार नाही. तसेच पीएफएमएस द्वारे 'अकाऊंट बेस' देयक प्रक्रिया देखील यापुढे केली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. कृषी विभागाने संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देताना, प्रत्येक लाभार्थ्याची अनुदान अदायगी 'आधार बेस अप्रुवल' घेऊनच करण्यात यावी, असे निर्देश दिले आहेत. यामुळे अनुदान वितरणात पारदर्शकता वाढेल आणि निधी थेट योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचेल, असा शासनाचा उद्देश आहे. दरम्यान, या नव्या प्रणालीमुळे शेतकऱ्यांनी काही आवश्यक बाबींकडे लक्ष देणे गरजेचे ठरणार आहे. विशेषतः आपले बँक खाते आधारशी जोडलेले आहे की नाही, याची खात्री करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच बँकेत जाऊन किंवा ऑनलाइन माध्यमातून आवश्यक ती दुरुस्ती करून घेणेही गरजेचे ठरेल. अन्यथा, अनुदान मिळण्यात अडथळे येण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकंदरीत, शासनाच्या या निर्णयामुळे अनुदान वितरण प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, त्यासाठी शेतकऱ्यांनीही आवश्यक ती तयारी करून नव्या प्रणालीशी जुळवून घेणे आवश्यक ठरणार आहे.

cmyk





## प्रणाली बनची धर्मादाय आयुक्तपदी निवड

बीड। प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील बंगाली पिंपळा येथील शेतकरी दादासाहेब बन यांची मुलगी प्रणाली दादासाहेब बन हिने दुसऱ्याच प्रयत्नात यशाला गवसणी घालत क्लास टुची पदवी मिळवत धर्मादाय आयुक्तीपदी वर्णी लागली. गावातील पहिली महिला अधिकारी म्हणून मान तिने मिळवला आहे. या यशाबद्दल बंगाली पिंपळासह परिसरात तिच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतूक केले जात आहे. दि.३१ मार्च रोजी बंगाली पिंपळा येथे ग्रामस्थांच्या वतीने प्रणाली बनचे जंगी स्वागत करण्यात आले. या स्वागताने आपण भारावून गेलो असल्याचे यावेळी प्रणालीने सांगितले. गेवराई तालुक्यातील बंगाली पिंपळा येथील दादासाहेब बन यांची मुलगी प्रणाली बनची धर्मादाय आयुक्तपदी निवड झाल्याने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. बंगाली पिंपळा गावातील पहिला महिला अधिकारी होण्याचा मानही प्रणालीने मिळविला आहे. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत शिक्षक पुर्ण केल्यानंतर क्लास टुची पदवी तीने अत्यंत जिद्दीने मिळविली आहे. तिच्या यशाबद्दल गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी प्रणालीच्या निवडीबद्दल तिचे गावातून मिरवणूक काढून जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी माजी सैनिक शांतीलाल गिरी, सरपंच तुकाराम तळतकर, सुरेश नवले, उत्तम खरात, महादेव बन, शाहू खरात, नवनाथ चौधरी, डॉ. आसाराम बन, उद्धव गायकवाड, दत्ता तिगुले, सोपान गिरी, मधुकर खरात, जयदिप गोल्हार, संदर बन, दिलीप नवले, शरद नवले, बालासाहेब आजबेसह आदींसह महिला,ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजलगावात महावीर जन्म कल्याणक महोत्सव साजरा

माजलगाव । प्रतिनिधी



माजलगाव शहरात भगवान महावीरांचा जन्म कल्याणक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प.पू.आचार्य मुनी श्री पवित्रसागरजी महाराज व मुनी श्री प्रशांतसागरजी महाराज यांची विशेष उपस्थिती लाभली. महोत्सवानिमित्त शहरातील झेंडा चौक येथील जैन मंदिरातून सकाळी ९ वाजता भव्य मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. ही मिरवणूक डॉ. आंबेडकर चौक, शिवाजी महाराज चौक मार्गे पुढे जात राजस्थानी मंगल कार्यालय येथे विसर्जित झाली. मिरवणुकीत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत भगवान महावीरांच्या जयघोषाने वातावरण भक्तिमय केले.यावेळी मुनी श्री पवित्रसागरजी महाराज यांनी जैन धर्म व भगवान महावीरांच्या शिकवणीवर मार्गदर्शनपर प्रवचन देत अहिंसा, सत्य आणि संयम या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमादरम्यान समाजातील चिमुकल्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त माजलगाव ब्लड सेंटर यांच्यावतीने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते, ज्याला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी परिश्रम घेतले.

# बोगस गुठेंवारीने खरेदीखत करुन अनाधिकृत बांधकाम सुरुच

## गेवराई नगर परिषदेची तक्रारीला केराची टोपली

गेवराई। प्रतिनिधी

तयबनगर गेवराई येथील सर्वे नंबर १२८/क मध्ये यापूर्वी शेख शमीमबी इस्माईल यांच्याकडून रिजवान फंगारी यांनी खोटी कागदपत्रे जमवून दिशाभूल करुन खरेदीखत केली व त्या सहन जागेवर बाधंकाम करण्याचे हालचाली सुरु करताच नगर परिषद मुख्याधिकारी यांना शमीमबी यांनी वेळोवेळी अर्ज विनंत्या करण्यात आल्या तरीही अनाधिकृत बांधकाम रिजवान फंगारी यांनी विक्री केलेल्या अमजद पाशा पठाण यांनी सुरुच ठेवल्याने एक प्रकारे नगर परिषदेने त्याला अभय दिले की काय असे दिसत आहे, याबाबत स्वीस्तर माहिती अशी की,तयबनगर येथील सर्वे नं.१२८ क मध्ये शेख शमीमबी इस्माईल यांच्याकडून बोळवण करुन बोगस कागदपत्रे बनवून सहन जागेची खरेदीखत करुन घेतले त्याचे काही रक्कम सुध्दा लिहूण घेणार यांना अदयाप मिळाली नसून दिलेले चेक सुध्दा बॅकेत वटली नसून गेवराई न्यायालयात प्रकरण सुध्दा चालु आहे,

सदरील माहिती अशी की,याबाबत नगर परिषद गेवराईची शमीमबी यांना बोगस गुठेवारी केल्याची नोटीस मिळाल्यानंतर त्यांच्या सगळा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी मुख्याधिकारी न.प.गेवराई यांना तात्काळ खुलासा सादर करुन तक्रारी अर्ज दिला तसेच वेळोवेळी सदरील बांधकामाबददल माहिती अर्जादवारे दिली मुख्याधिकारी यांनी ७ दिवसाच्या आत बांधकाम काढून घेण्यात यावे करीता सबंधिताला नोटीसही दिली परंतू त्यावर काहीच परिणाम झाल्याचे दिसून येत नाही बांधकाम सुरुच आहे, रिजवान इरफान फंगारी यांनी शमीमबी यांना तुमच्या सहन जागेचे कागदपत्रे बनविल्याशिवाय




कोणाला विकता येणार नाही,म्हणून विष्वासात घेवून मी कागदपत्रे बनवून आणतो तसेच मी हे सहन जागे घेतो असे ठरले परंतू त्यांनी बोगस कागदपत्रे,व बोगस गुठेंवारी जिचा संचिका क्रमांक २८९/दि.२०/१२/२०२१ संचीका क्रमांक २६५/२६/११/२०२१ यादवारे रिजवान फंगारी याने माझे अज्ञानपणाचा फायदा घेवून मला खोटी धनादेश चेक देवून फसवणुक तर केलीच परंतु बोगस कागदपत्र जोडून खरेदीखत केले तसेच सदरील सहन जागा अमजद पाशा पठाण याला विक्री केले पहिल्यापासून मी नगर परिषदेमध्ये खुलासा करण्यापासून आजपर्यंत तक्रारी अर्ज करीत असून मुख्याधिकारी यांनी प्राथमीक कार्यवाही केली असून बांधकाम थांबविण्याकामी कोणतीही ठोस अशी कार्रवाई करण्यात आली नाही,तसेच रिजवान यांनी धनदाडंग्या व्यक्तीला सदरील प्लॉट काळंबेरं करुन विक्री दिला आहे, अबला अशिक्षीत महिलेचे फसवणूक होवून अन्याय झाले असून मुख्याधिकारी नगर परिषद गेवराई यांनी तात्काळ कारवाई करण्यात यावी यासाठी जिल्हाधिकारी यांनी दखल घ्यावी अशी मागणी अर्जादवारे करण्यात आली आहे

## बीडचे अशोक जाधव 'एज्युकॉन शैक्षणिक सन्मान' पुरस्काराने गौरवित

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

मराठवाडा विभागातील शैक्षणिक क्षेत्रात आणि बीड शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारे अशोक अण्णा जाधव यांना आज 'एज्युकॉन शैक्षणिक सन्मान' पुरस्काराने अत्यंत दिमाखदार सोहळ्यात सन्मानित करण्यात आले. नवभारत / नवराष्ट्र समूहाच्या वतीने आयोजित हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा आज, ३१ मार्च २०२६ रोजी हॉटेल ट्रीट इम्पेरियल, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडला.यावेळी राज्याचे दुग्धव्यवसाय विकास,अपारंपारिक ऊर्जा आणि दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे,आमदार विक्रम काळे,दैनिक नवराष्ट्र नवभारत समूहाचे ग्रुप प्रेसिडेंट ए श्रीनिवास,दैनिक नवराष्ट्र छत्रपती संभाजी नगर आवृत्तीचे सरव्यवस्थापक कल्याण पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न झाला यावेळी सुधाकर मंचुके,प्रा सुनील कदम,बीड जिल्हा प्रतिनिधी रवी उबाळे यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते




मराठवाडा विभागातील शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय आणि अनमोल योगदान देणाऱ्या निवडक मान्यवरांना या पुरस्काराने गौरविण्यात येते. अशोक अण्णा जाधव यांनी बीड शहरात आदर्श प्राथमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,स्वातंत्र्य सैनिक बनसीधरराव जाधव प्राथमिक व माध्यमिक विद्यालय तसेच जिजामाता प्राथमिक विद्यालय,सौ सी बी जाधव मुलींचे बालकाश्रम यांसारख्या नामांकित शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा घराघरात पोहोचवली आहे. त्यांच्या याच निस्वार्थ कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. अशोक अण्णांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याने बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात आनंदाचे वातावरण आहे. पुरस्कार स्वीकारल्यानंतर त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संस्थेतील सर्व मुख्याध्यापक,प्राचार्य आणि शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी पालक आणि विद्यार्थी या सर्वांनी अण्णांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.''हा सन्मान म्हणजे आमच्या शैक्षणिक परिवाराचा गौरव आहे,'' अशा भावना यावेळी अशोक जाधव यांनी व्यक्त केल्या,पुरष्कार मिळाल्याबद्दल बीडमधील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले

## माजलगाव शहरातील मतदारांनी एस आय आर मॅपिंग करून घ्यावे :रत्नपारखी

### मतदार यादीतील नावे वगळली जाणार

माजलगाव। प्रतिनिधी



बीड जिल्ह्यात सध्या विशेष पुनरनिरीक्षण अभियान कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या या महत्त्वपूर्ण विषयावर पूर्वतयारी मोहिमेत सर्व मतदारांनी आपल्या मतदार यादीतील माहितीची तपासणी करून घ्यावी व आपले नाव मतदार यादीत निश्चित करून घ्यावे, तसे न केल्यास आपले मतदार यादीतील नाव वगळण्यात येतील असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

सध्याच्या मतदार यादीत काही ठिकाणी दुबार नोंदी असल्यामुळे संबंधित मतदारांना अनेक ठिकाणी मतदानाची नोंद दिसून येते. त्यामुळे प्रत्येक मतदाराचे नाव देशात फक्त एका ठिकाणीच असावे, यासाठी निवडणूक आयोगाने हा कार्यक्रम राबविला आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून माजलगाव मतदारसंघातही प्रत्येक ठिकाणी बीएलओ () नेमण्यात आले आहेत.

मतदारांनी आपल्या संबंधित बीएलओ मार्फत मतदार यादीतील मतदानाची खात्री करून घ्यावी व त्याच अनुषंगाने माजलगाव शहरातील सर्व मतदारांनी आपली मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करावी. मतदारांनी मॅपिंग न केल्यास मतदार यादीतील नाव वगळले जाण्याची शक्यता आहे व त्यामुळे आपण मतदानापासून व अनेकांना मिळणाऱ्या शासकीय सुविधा पासून वंचित राहू शकतात त्यामुळे मतदारांनी आपले नाव मतदार यादी मध्ये राहण्यासाठी बी एल ओ यांना आपली माहिती द्यावी असे आवाहन विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

## सरकारने दिलेली कर्जमाफी ही विना अटी शर्ती सरसकट करावी -कॉ.अजित नवले

माजलगाव। प्रतिनिधी



निवडणूक काळात दिलेल्या आश्वासना प्रमाणे कर्जबाजारी शेतकऱ्यांसाठीची संपूर्ण कर्जमाफी ची घोषणा करून महाराष्ट्र राज्याचे सध्याचे युती सरकार सत्तेवर आले सत्तेवर आल्यानंतर या सरकारने अटी शर्थी व मुदती घालून कर्जमाफीची घोषणा केली ती फसवी ठरू नये म्हणून दिलेल्या आश्वासना प्रमाणे विना अट विना शर्थ सरसकट कर्ज माफी करावी तसेच अनेक ऊस कारखानदारांनी शेतकऱ्यांची मागील तीन महिन्यात ऊस बिलांचे पेमेंट अदा केले नाहीत ती थकीत ऊस बिले त्वरित व्याजासह अदा करावीत अशी मागणी शेतकरी नेते, माकपचे राज्य सचिव कॉ. अजित नवले यांनी माजलगाव येथील पत्रकार परिषदेत केली.

राज्यातील वाढत्या जातीय अत्याचाराच्या घटना व अंधश्रद्धा व भोंदूगिरीच्या घटनांना सध्याचे दुटप्पी भूमिका असणारे सरकार जबाबदार असून त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यातील भोंदुगिरी व वाढती गुन्हेगारी हे देवेंद्र फडणवीस यांच्या गृहखात्याचे अपयश असल्याची टीका त्यांनी केली. सरकारने शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, शेतकऱ्यांचे थकीत ऊस बिल, पिक विमा हे प्रश्न लवकर नाही सोडवले तर येणाऱ्या काळात महाराष्ट्रात मोठे आंदोलन करण्यात येईल असा इशाराही यावेळी कॉ. अजित नवले यांनी दिला. या पत्रकार परिषदेला डॉ. अजित नवले यांच्यासह किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. अजय बुरांडे, कॉ. मोहन जाधव, ज्येष्ठ माकप नेते कॉ. मुसद्दीक बाबा सर, तालुका सचिव कॉ. शिवाजी कुरे, कॉ. कृष्णा सोळंके, लहू खारगे यांच्या सह अनेक पत्रकारांची उपस्थिती होती.

सध्या महाराष्ट्रामध्ये गाजत असलेले नाशिक जिल्ह्यातील भोंदू बाबा प्रकरणी आरोपीवर कडक कारवाई करून यामध्ये सहभागी असलेल्या सर्व सरकारमधील मंत्री, ३९ आमदार व इतर राजकीय कार्यकर्त्यांवर सरकारने तात्काळ कारवाई करावी व या प्रकरणात ज्या पीडित महिलांचे व्हिडीओ सोशल मीडिया वर व्हायरल होत आहेत ज्या मुळे त्या पीडित महिलांच्या अब्रू बरोबरच पुरोगामी महाराष्ट्राची देशभर बदनामी होत आहे ते सर्व व्हायरल व्हिडिओ सोशल मीडियावरून काढून घ्यावेत अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे वतीने राज्य सचिव, शेतकरी नेते कॉ. अजित नवले यांनी पत्रकार परिषदेत केली.

## कागदपत्रे हरवले आहे

दांगट सतिशराव राधाकृष्ण रा. पेंडगाव ता. जि. बीड यांचे मालमत्तेचे मूळ नोंदणीकृत विक्रीपत्र क्र.२०६३/१९९७ प्लॉट क्र .२९ सर्व्हे क्र.३४ तरफ गिराम नगर परिषद क्र .१-३-७७६ नगर रोड कसबे बीड ता.बीड जि. बीड दिनांक २८/०२/२०२६ रोजी पेंडगाव बीड ते साक्षळपिंप्री प्रवासा दरम्यान गहाळ झाले आहे. सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधा

संपर्क : ९४२२७४४७२९

मार्फत : ॲड एम आर उबाळे

## जाहीर प्रगटन

**मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ११३/२०२६**

**सुशिला व इतर विरुध्द निरंक**

**मार्फत ॲड. टी. बी. भालेराव**

अर्जदार :- १. श्रीमती सुशिला भ्र रमेश उर्फ केरू सोनवणे, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, २. श्री. विजय पि. रमेश उर्फ केरू सोनवणे, वय ३५ वर्षे, धंदा खासगी नोकरी, ३. सौ. अश्विनी भ्र रंजीत बनसोडे, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, ४. सौ. सपना भ्र बाळु शिंदे, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, अर्जदार क्र. १ व २ रा. उखंडा ता. पाटोदा जि. बीड. ह.मु. रामवाडी, पूणे ता. जि. पुणे अर्जदार क. ३ रा. गुलमोहर अपार्टमेन्ट सेक्टर नं.९ नवी मुंबई, वाशी, ता. वाशी जि. ठाणे अर्जदार क्र. ४ रा. रामवाडी, दलित मित्रमंडळ, नगररोड, पूणे-१४.

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांनी या न्यायालयात मयत रमेश उर्फ केरू पि. हरीभाऊ सोनवणे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी रमेश उर्फ केरू पि. हरीभाऊ सोनवणे यांचा मृत्यु दिनांक २३/१२/२०२५ रोजी रामवाडी, पुणे ता. जि. पुणे येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे व अर्जदार क्र. ३ व ४ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत रमेश उर्फ केरू पि. हरीभाऊ सोनवणे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०८ जुन २०२६.

स्वाक्षरित
क. लिपीक

आदेशावरून
स्वाक्षरित
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. वसंत एस. यादव साहेब, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ४७७/२०२६**

**नरसिंग भटे व इतर विरूध्द - निरंक**

**(मार्फत ॲड. जी. एस. घुगे बीड)**

अर्जदार : १) नरसिंग पि. नारायन भटे, यय ६६ वर्ष धंदा शेती रा. सोनपेटयाडी पो. कळसंबर ता. जि. बीड. २) भिमराव पि. नारायन भटे, वय ६६ वर्ष धंदा शेती रा. सोनपेटवाडी पो. कळसंबर ता. जि. बीड. ज्याअर्थी मयत नामे जनाबाई नारायण भटे रा. सोनपेटवाडी ता. जि. बीड हे दि. १६.०१.२०२६ रोजी मौजे सोनपेटवाडी ता.जि. बीड येथे मयत झाले आहेत.

(१) असे की. अर्जदार क्र.१ व २ हे मयत जनाबाई नारायन भटे हिचे मुले आहेत. जनाबाई नारायन भटे हीचा दिनांक १६/०१/२०२६ रोजी अजारपनाने राहते घरी निधन झाले. मयताचे ग्रुप ग्रामपचायत कार्यालय सोनपेटवाडी, जैताळवाडी ता. जि. बीड यांनी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र या अर्जासोबत दाखल केले आहे.

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे जनाबाई नारायण भटे रा. सोनपेटवाडी ता.जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज १८-०३-२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः ०४.०५.२०२६

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

**बेंच क्लार्क**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ५००/२०२६**

**छायाबाई विरूध्द निरंक**

अर्जदार : १. छायाबाई भ्र. बबन शिंदे वय ५३ वर्षे, धंदा ऊसतोड मजुरी सध्या निरंक २. कैलास पि. बबन शिंदे वय-२६ वर्षे, धंदा-सुशिक्षीत बेरोजगार ३. विलास पि. बबन शिंदे वय-२४ वर्षे, धंदा सुशिक्षीत बेरोजगार सर्व रा. बलिपुर जवळा ता.जि. बीड

विरुध्द निरंक मागणी

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात बबन विठोबा शिंदे यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत बबन विठोबा शिंदे यांचा मृत्यु दिनांक १४/११/२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदार क्र. १ ते ३ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत बबन विठोबा शिंदे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार क्र. १ ते ३ सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत बबन विठोबा शिंदे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/०४/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०४/०५/२०२६ आहे.

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

## सौताडा येथे हरणाची शिकार करुन मांस विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

### एका महिलेसह दोन ताब्यात

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील सौताडा परिसरात काळवीट हरणाची शिकार करून त्याचे मांस विकणाऱ्या एका टोळीवर वनविभागाने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत हरणाचे मांस, कातडी आणि शिकारीचे साहित्य जप्त करण्यात आले असून एका महिलेसह दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.सौताडा येथील माळरानावरील पवनचक्कीच्या पायथ्याशी काही लोक काळवीट हरणाची शिकार करून त्याचे मांस विकत असल्याची माहिती वनविभागाला मिळाली होती. या माहितीनुसार, पाटोदा पोलिसांनी छापा टाकला असता मुख्य आरोपी प्रमोद रंजू काळे (वय ४०, रा. जामखेड) हा पोलिसांना पाहताच घटनास्थळावरून पसार झाला.

जप्त केलेला मुद्देमाल: वनविभागाच्या पथकाने घटनास्थळावरून खालील साहित्य जप्त केले आहे: हरणाचे कापलेले मांस आणि कातडी. मांस तोडण्यासाठी वापरला जाणारा मोठा लाकडी ठोकळा. सत्तूर, कुकरी आणि इतर हत्यारे. तितर पक्षी पकडण्यासाठी वापरले जाणारे दोन पिंजरे. न्यायालयीन कारवाई: या प्रकरणी वनविभागाने जनाबाई प्रमोद काळे (वय ३५) आणि वाघमोडे नावाच्या व्यक्तीला ताब्यात घेतले. वाघमोडे हा शेतमजूर असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला या प्रकरणात साक्षीदार करण्यात आले आहे. आरोपी महिलेला सोमवारी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने तिला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पुढील तपास: या प्रकरणाचा सखोल तपास वनविभागामार्फत सुरू असून, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. वन्यजीवांच्या शिकारीसारख्या गंभीर गुन्ह्यांविरुद्ध कठोर पावले उचलली जात असून, परिसरात गस्त वाढवण्यात आली आहे. वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत अशा प्रकारच्या कृत्यांना कडक शासन करण्याची तरतूद आहे. नागरिकांनी वन्यजीवांच्या संरक्षणासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

cmyk

# कृषी अवजार बँक सुरु करण्यासाठी मिळणार आता २४ लाखांपर्यंत अनुदान

मुंबई : नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोकराच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत आता गावागावांत महिला बचतगटांच्या माध्यमातून कृषी अवजार बँका स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. ग्रामीण भागातील शेतीचे यांत्रिकीकरण वाढविण्यासोबतच महिला बचतगटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

या योजनेंतर्गत पात्र गटांना प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या तब्बल ६० टक्क्यांपर्यंत, म्हणजेच कमाल २४ लाख रुपयांपर्यंत अनुदान मिळणार आहे. ग्रामीण भागात शेतीमध्ये काम करण्यास मजुरांचा तुटवडा मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. त्यामुळे पारंपरिक पद्धतीऐवजी शेतकऱ्यांचा कल यांत्रिकीकरणाकडे वाढला आहे. मात्र, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना महागडी कृषी यंत्रसामग्री खरेदी करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. त्यासाठी आता कृषी विभागाने गावस्तरावर अशी यंत्रे भाडेतत्त्वात्वर उपलब्ध करून देण्याचा भाग म्हणून हा नवा प्रकल्प हाती घेतला आहे. त्यामुळे शेती कामांतील मजुरीचा खर्च कमी होऊन कामांना गती मिळणार आहे.



पेरणीच्यावेळी ही सामग्री महत्त्वाचा भाग ठरणार आहेत. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कृषी विभागाच्या आत्मा प्रकल्पाच्या वतीने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प राबविण्यात येत आहे. कृषी अवजारे बँकेसाठी प्रकल्प मूल्याच्या ६० टक्के अथवा जास्तीत जास्त अनुदान महिला बचत गटांना मिळणार आहे.

महिला बचत गटांना संधी : ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कृषी अवजार बँक ही संकल्पना महत्त्वाची ठरत आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोकरा अंतर्गत महिला बचतगटांना या योजनेत प्राधान्य देण्यात येत असून, त्यांना व्यवसाय उभारण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

कुठे आणि कशी करायची नोंदणी : इच्छुक महिला बचत गटांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जासोबत बँकेचे तपशील आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक आहे.गावपातळीवर कृषी अवजार बँक स्थापणार : गावपातळीवर शेतकऱ्यांना आधुनिक शेती अवजारे सहज आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध व्हावीत, यासाठी कृषी अवजार बँक स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कोणती अवजारे खरेदी करता येणार? योजनेंतर्गत निवड झालेल्या गटांना ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचलित अवजारे, बीबीएफ यंत्र, रोपणी व लावणी यंत्र, मल्चिंग मशीन, कम्बाईन हार्वेस्टर, तसेच फवारणी पंप यासारखी आधुनिक कृषी यंत्रसामग्री खरेदी करता येणार आहे. त्या-त्या भागातील पीक पद्धतीनुसार आधुनिक यंत्र खरेदी करता येणार आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७९ : औरंगजेबाने हिंदूवर 'जिझिया' कर लावला.
१८७० : गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' यांच्या प्रेरणेने पुणे सार्वजनिक सभेची स्थापना झाली.
१८८५ : मध्ये स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मूळ 'पुणे सार्वजनिक सभा' आणि 'बॉम्बे असोसिएशन' या संस्थांमध्ये आहे असे मानले जाते.
१८९४ : छत्रपती राजार्षी शाहू महाराज यांचा राज्याभिषेक झाला.
१९७५ : कॅनडामध्ये जगात सर्वात जास्त उंचीचा म्हणजे ५५५.३५ टॉवर बांधून पुर्ण झाला.
१९८२ : फॉकलंडचे युद्ध - अर्जेंटिनाने फॉकलंड बेटे पादाक्रांत केली.
१९८४ : सोयुझ टी-११ या अंतराळयानातुन राकेश शर्मा या पहिल्या भारतीय अंतराळवीराने उड्डाण केले. तो ७ दिवस २१ तास व ४० मिनिटे अवकाशात होता.
१९८९ : ताणलेले संबंध सुधारण्यासाठी रशियाचे अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांचे क्यूबातील हॅवाना येथे आगमन
१९९० : स्मॉल इन्डस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडियाची स्थापना
१९९८ : कोकण रेल्वेवरून धावणारी निजामुद्दीन तिरुअनंतपुरम राजधानी एक्स्प्रेस या गाडीचा प्रारंभ झाला.
२०११ : अठ्ठावीस वर्षांच्या कालखंडानंतर भारतचा क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत विजयी.
२०११ : क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेत भारताचा २८ वर्षांच्या कालखंडानंतर विजय.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१८ : फ्रॅन्सिस्को मारिया ग्रिमाल्डी - इटालियन गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २८ डिसेंबर १६६३)
१७८१ : स्वामीनारायण, भारतीय धर्मगुरू.
१८०५ : हान्स अँडरसन - डॅनिश परिकथालेखक (मृत्यू: १८७५)
१८७५ : वॉल्टर ख्राइसलर - 'ख्राइसलर' कंपनीचे संस्थापक (मृत्यू: १८ ऑगस्ट १९४०)
१८८२ : प्रसिध्द कादंबरीकार नाथमाधव.
१८९८ : हरिन्द्रनाथ चट्टोपाध्याय - हिन्दी चित्रपटांतील प्रसिद्ध चरित्र अभिनेते. त्यांच्या 'साहिब, बिबी और गुलाम', 'बावर्ची' इ. चित्रपटांतील भुमिका विशेष गाजल्या. ते कवी (इंग्रजी), नाटककार, संगीतज्ञही होते. (मृत्यू: २३ जून १९९० मुंबई, महाराष्ट्र)
१९०२ : बडे गुलाम अली खाँ ऊर्फ 'सबरंग' - पतियाळा घराण्याचे गायक व वीणावादक, त्यांच्या 'याद पियाकी आये', 'का करु सजनी' इ. ठुमर्या लोकप्रिय आहेत. (मृत्यू: २५ एप्रिल १९६८ हैदराबाद, तेलंगण)
१९१४ : भारताचे पहिले फील्डमार्शल जनरल माणकेशा.
१९२६ : सूर्यकांत रामचंद्र खांडेकर - कवी व गीतकार (मृत्यू: १५ जून १९७९)
१९४२ : भारतीय इंग्रजी-अभिनेते रोशन सेठ यांचा जन्म.
१९६२ : जयाप्रदा - प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्री व संसद सदस्य.
१९६५ : नाझिया हसन, हिंदी पॉप गायिका.
१९६९ : हिंदी चित्रपट अभिनेता अजय देवगण यांचा जन्म.
१९७२ : भारतीय नृत्यदिग्दर्शक रेमो डिसूझा यांचा जन्म.
१९८१ : भारतीय स्टॅंड-अप कॉमेडीयन कपिल शर्मा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२० : पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ.
१८७२ : सॅम्युअल मोर्स - 'मोर्स कोड' व तारायंत्राचे जनक आणि चित्रकार (जन्म: २७ एप्रिल १७९१)
१९९२ : आगाजान बेग ऊर्फ आगा - आपल्या निखळ विनोदानी रसिकांच्या पसंतीस उतरलेले अभिनेते
१९३३ : के. एस. रणजितसिंहजी - कसोटी क्रिकेट खेळाडू व महाराजा, यांच्या स्मरणार्थ १९३४ पासून 'रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा' खेळल्या जातात. (जन्म: १० सप्टेंबर १८७२)
२००५ : पोप जॉन पॉल (दुसरा) (जन्म: १८ मे १९२०)
२००९ : गजाननराव वाटवे - गायक व संगीतकार (जन्म: ८ जून १९१७).

# आंबा बाग पाणी व्यवस्थापन



आंबा उत्पादनात गुणवत्ता आणि फळधारणा सुधारण्यासाठी योग्य पाणी व्यवस्थापन गरजेचे आहे. आंबा झाडांसाठी पाण्याचे नियोजन योग्य प्रकारे केल्यास फळांची गळ कमी होते आणि उत्पादनात वाढ होते.

फळधारणा झालेल्या आंबा बागेतील पाणी व्यवस्थापन : जेव्हा आंबा झाडे फळधारणेच्या अवस्थेत पोहोचतात, विशेषतः वाटाणा ते सुपारी आकाराच्या फळांपर्यंत, तेव्हा झाडांना नियमित आणि नियंत्रित प्रमाणात पाणी देणे आवश्यक असते. पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रति झाड या प्रमाणात द्यावे. १५ दिवसांच्या अंतराने ३-४ वेळा पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन (मल्चिंग) केल्यास मुळांभोवती ओलावा टिकून राहतो आणि पाण्याचा योग्य वापर होतो.

नवीन लागवड केलेल्या झाडांसाठी पाणी व्यवस्थापन : नवीन लागवड केलेल्या झाडांसाठी योग्य प्रमाणात पाणी दिल्यास ती चांगली वाढतात आणि उत्पादनक्षम होतात. हिवाळा आणि उन्हाळा यानुसार पाणी देण्याचे प्रमाण वेगवेगळे असते.

हिवाळ्यात पाणी व्यवस्थापन : पहिल्या वर्षी आठवड्यातून एकदा ३० लिटर (२ बादल्या) पाणी प्रति झाड द्यावे. दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसांतून एकदा ३० लिटर पाणी द्यावे.

तिसऱ्या वर्षी महिन्यातून एकदा ३० लिटर पाणी पुरेसे असते.

उन्हाळ्यात पाणी व्यवस्थापन : उन्हाळ्यात पाण्याची गरज वाढते, त्यामुळे वरील प्रमाणात दुप्पट (६० लिटर) पाणी प्रति झाड द्यावे.

जागेवर रोपे तयार करणे आणि पाणी बचत : आंबा रोपवाटिकेत किंवा जागेवरच झाडांची रोपे वाढवून त्यावर कलमे केल्यास त्यांना विशेष पाणी द्यावे लागत नाही. अशा रोपांमध्ये मुळांची नैसर्गिक वाढ होते, त्यामुळे कमी पाण्यातही ती तग धरतात. गवताचे आच्छादन (मल्चिंग) केल्यास मातीतील ओलावा टिकून राहतो, परिणामी पाणी देण्याची गरज कमी होते.


अधिक उत्पादनासाठी : आंबा झाडांची वाढ आणि उत्पादन हे मोठ्या प्रमाणात पाणी व्यवस्थापनावर अवलंबून असते. नियंत्रित प्रमाणात आणि योग्य वेळेत पाणी दिल्यास झाडांची गळ कमी होते आणि फळधारणा वाढते. तसेच, मल्चिंगसारख्या तंत्रांचा वापर केल्यास पाण्याची बचत होते आणि झाडांचे आरोग्य सुधारते.जर तुम्हाला तुमच्या आंबा बागेच्या उत्पादनात वाढ करायची असेल तर वरील पाणी व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करा आणि अधिक उत्पादन घ्या.

# शेतकऱ्यांनो, खताचे पैसे वाचविण्यासाठी हे करा

अलीकडच्या काळात अनेक शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळताना दिसत आहेत. सेंद्रिय शेती मधून येणाऱ्या पिकाला बाजारात भावसुद्धा चांगला मिळत असल्याने यावर भविष्यात मागणी वाढण्याची शक्यता आहे. सेंद्रिय शेतीसाठी जमिनीतील सेंद्रिय घटक फार महत्वाची भूमिका पार पाडतात. आता जमिनीतील हे सेंद्रिय घटक कसे वाढवायचे याबाबत माहिती जाणून घेतल्यास शेतकऱ्यांचा खतासाठी होणारा खर्च वाचणार आहे.

उष्ण हवा आणि कमी पाऊस यांमुळे अधिकतर क्षेत्रातील सेंद्रिय घटकांचे भस्मीकरण जलद गतीने होते. सेंद्रिय भागाचे विघटन व भस्मीकरण होणे ही बाब महत्त्वाची आहे. पण उष्ण हवेत ही प्रक्रिया फार जलद होते. त्यामुळे सेंद्रिय घटक तयार होण्याच्या क्रियेत समतोलपणा राहत नाही. हा समतोलपणा येण्यासाठी खालील उपायांचा अवलंब करावा.

१) जमिनीस अधिक प्रमाणात सेंद्रिय खते किंवा भरखते पुरविली पाहिजेत. भरखते ही एकाच वेळी भरपूर प्रमाणात न देता ती प्रत्येक पिकास टप्प्याटप्याने परंतु नियमितपणे द्यावीत. २) जमिनीतील सेंद्रिय घटक नैसर्गिक हवामान बदलावर अवलंबून असल्याने त्याचे प्रमाण वाढविणे अशक्यप्राय आहे. परंतु त्याचा समतोल राखला जाईल यासाठी कंपोस्ट खत, शेणखत, पालापाचोळा, पिकांचे अवशेष वगैरेंचा वापर करावा. ३) धैंचा, ताग, शेवरी, बरबडा तसेच पार्थेनियम यासारख्या हिरवळीच्या खतांची लागवड करून ती पिके फुलोऱ्यात येताच जमिनीत गाडावीत. हिरवळीची पिके पेरताना व नांगरून टाकताना फॉस्फेटयुक्त खते द्यावीत किंवा हिरवळीचे पीक गाडल्यानंतर घेण्यात येणाऱ्या पिकांच्या स्फुरदाची खत मात्रा हिरवळीच्या खतात द्यावी. ४) कडधान्यवर्गीय गवते उदा. टाकळा, तरवड, बरबडा फुलोऱ्यात येण्यास सुरुवात होत असताना अथवा पार्थेनियमसारखी पिके फुलोऱ्यापूर्वी शेतात गाडल्यास त्यापासूनही जमिनीमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविता येते. ५) सुबाभूळ अथवा गिरीपुष्प यांसारखी झाडेसुद्धा बांधावर लावून त्यांची एक मीटरवर वारंवार छाटणी करून त्यांच्या कोवळ्या फांद्या शेतात नुसत्या पसरल्या तरीही त्यांचा तिहेरी फायदा होतो. पहिला फायदा जमिनीवर आच्छादन करता येते. त्यामुळे पावसाच्या थेंबाने होणारी मातीची धूप थांबविता येते. तसेच जमिनीत जास्त पाणी मुरविता येते व बाष्पीभवनामधून उडून जाणाऱ्या पाण्याचे संवर्धन करता येते. तसेच या फाद्यांचे कर्ब- नत्राचे गुणोत्तर कमी असल्यामुळे त्याचे दीड ते दोन महिन्यांत भस्मीकरण होऊन पुढील पिकास अन्नद्रव्यांचा चांगला पुरवठा होतो व रासायनिक खताची मात्रा कमी करता येते. भस्मीकरणाची क्रिया सावकाश करण्यासाठी जमिनीवर पालापाचोळ्याचा थोडा जास्त थर राहू द्यावा, यालाच इंग्रजीत ऑरगॅनिक मल्च (सेंद्रिय आच्छादन) असे म्हणतात. ६) जमिनीची कमीत कमी मशागत केल्यास सेंद्रिय पदार्थाचा ऱ्हास होत नाही. एकंदरीत जमिनीतील सेंद्रिय घटक हे पीक उत्पादनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत व त्याची घट वरचेवर भरून काढणे अत्यावश्यक आहे. ज्या शेतीमध्ये जमिनीतील सेंद्रिय घटकांचे प्रमाण कमी होत जाते ती शेती किफायतशीर होऊ शकत नाही. शेतकऱ्यांनी याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.




# डाळिंबाची सुधारित लागवड पद्धत

डाळिंब हे भारतातील एक महत्त्वाचे फळ पीक आहे. त्याचा उगम इराणमध्ये झाला आणि स्पेन, मोरोक्को, इजिप्त, इराण, अफगाणिस्तान आणि बलुचिस्तान यांसारख्या भूमध्यसागरीय देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर डाळिंबाची शेती केली जाते. म्यानमार, चीन, यूएसए काही प्रमाणात त्याची लागवड केली जाते.

डाळिंबाच्या लागवडीत भारताचा जगात पहिला क्रमांक लागतो. भारतात, महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तामिळनाडू राजस्थान ही प्रमुख डाळिंब उत्पादक राज्ये आहेत. ९.४५ लाख मे.टन वार्षिक उत्पादन आणि १०.५ मेट्रिक टन/हेक्टर उत्पादकतेसह ९० हजार हेक्टर क्षेत्रासह महाराष्ट्र आघाडीवर आहे. भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या ७८ टक्के आणि एकूण उत्पादनाच्या ८४ टक्के वाटा महाराष्ट्र राज्याचा आहे.

हवामान : यशस्वी डाळिंब लागवड मूलतः कोरडे आणि अर्ध-रखरखीत हवामान असते, जेथे थंड हिवाळा आणि उच्च कोरड्या उन्हाळ्याच्या गुणवत्तेमुळे फळांचे उत्पादन शक्य होते. फळांच्या विकासासाठी इष्टतम तापमान ३५ -३८ डिग्री सेल्सियस आहे. समुद्रसपाटीपासून ५०० मीटर उंच असलेला प्रदेश डाळिंब लागवडीसाठी योग्य आहे.

माती : पिकाची गरज लक्षात घेऊन, कमी-सुपीक ते उच्च-सुपीक जमिनीपर्यंत वेगवेगळ्या



प्रकारच्या मातीत डाळिंब पीक घेता येते. तथापि, खोल चिकणमातीमध्ये, ते उत्कृष्ट उत्पादन देते. ते जमिनीतील क्षारता आणि क्षारता एका मर्यादेपर्यंत सहन करू शकते. डाळिंब शेतीसाठी ६.५ ते ७.५ दरम्यान पीएच श्रेणी असलेली माती आदर्श आहे.

प्रसार पद्धत : डाळिंबाची झाडे हार्डवुड कटिंग, एअर लेयरिंग आणि टिश्यू कल्चरद्वारे व्यावसायिकरित्या प्रसारित केली जाऊ शकतात.

हार्डवुड कटिंग प्रसार - ही पद्धत सोपी असली तरी तिचा यशाचा दर कमी आहे, त्यामुळे ही पद्धत शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय नाही. ९ ते १२ इंच (२५ ते ३० सें.मी.) लांबीच्या एक वर्षाच्या झाडापासून निवडलेल्या छाटणीसाठी, ४-५ काड्या जास्त रुजण्यासाठी आणि जगण्यासाठी उत्तम असतात. एअर-लेयरिंग प्रसार - नवीन रोपे वाढवण्याची शेतकऱ्यांची ही सर्वात सामान्य पद्धत आहे. एअर लेयरिंग पद्धतीसाठी, २ ते ३ वर्षे जुनी झाडे निवडाली जातात आणि चांगल्या मुळांसाठी (१,५०० ते २,५०० ) उपचार केला जातो. एका रोपापासून सुमारे १५० ते २०० रुजलेली कलमे मिळू शकतात. लेयरिंगसाठी पावसाळा सर्वात योग्य आहे. मुळांसाठी सुमारे ३० दिवस लागतात. ४५ दिवसांनंतर, स्तरित रोपे मातृ रोपापासून वेगळी कली जातात. तज्ञ डाळिंब उत्पादक मुळांच्या रंगाचे निरीक्षण करून विलग होण्याची वेळ ओळखतात जेव्हा ते तपकिरी होऊ लागतात तेव्हा स्तरित कलमे वेगळे करतात. नंतर ती पॉलीबॅगमध्ये उगवली जातात आणि शेड नेट किंवा ग्रीनहाऊसमध्ये ९० दिवसांपर्यंत ठेवतात.

टिश्यू कल्चर प्रसार : टिश्यू कल्चर हे वनस्पतींच्या गुणाकाराचे आगाऊ आणि जलद तंत्र आहे. या तंत्राचा वापर करून, तुम्ही कमी कालावधीत रोगमुक्त लागवड साहित्य मिळवू शकतो. ही टिश्यू कल्चर रोपे डाळिंब रोपवाटिकेत उपलब्ध आसतात ; ही रोपे विश्वासार्ह स्त्रोताकडून खरेदी करावीत.

व्यावसायिक डाळिंबाच्या जाती : भारतात वाढणाऱ्या या व्यावसायिक जाती आहेत. भगवा, मृदुला, गणेश, ज्योती, जालोरे सीडलेस, कंधारी, फुले अरक्त, फुले भगवा सुपर, भगवा सिंदूर. देशांतर्गत आणि निर्यातीसाठी जास्त मागणी असल्यामुळे भागवा ही सर्वात जास्त लागवड केलेली जात आहे.

# जमिनीतील नत्र कमी होण्याची कारणे

नत्र हा पिकांच्या वाढीसाठी आणि विकासासाठी एक आवश्यक घटक आहे. पिकांच्या चयापचयामध्ये नत्र महत्वाचे असून नत्र पिकाचे अन्नद्रव्य म्हणून कार्य करते. हवेतील नत्र झाडांद्वारे कमी प्रमाणात घेतलं जातं तसेच, मातीतील कमी नत्राची उपलब्धता, ही बहुतेक वेळा पिकांची वाढ आणि उत्पन्न कमी होण्यास कारणीभूत ठरते.

नत्राचा योग्य पुरवठा केल्यास पिकाला चांगली फुले व फळे लागतात. पिकाचा नत्र ग्रहणाचा दर, एकूण दिलेल्या नत्र दराच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी राहतो आणि निम्म्याहून अधिक नत्र- हवा आणि पाण्यातून वातावरणात निघून जातो. अशा परिस्थितीत शेतकऱ्याने खर्च करून टाकलेले नत्र पिकांसाठी योग्य प्रकारे वापरले जावे यासाठी नत्राचे व्यवस्थापन महत्त्वाचे ठरते. मात्र विविध मार्गाने नत्राचा ऱ्हास होत असतो. पिकाला दिलेले नत्र किती प्रमाणात मिळते हे वापरण्याच्या पद्धतीवर अवलंबून असते. ओल्या जमिनीत युरिया दिल्यानंतर त्याची पाण्यासोबत अभिक्रिया होऊन अमोनियम तयार होतो. युरिया जर पारंपरिक पद्धतीने शेतात फेकून दिला, तर ही अभिक्रिया मातीवर म्हणजेच उघड्यावर होते. अमोनियमचे अमोनिया गॅसमध्ये रुपांतर होऊन तो लगेच हवेत उडून जातो. म्हणून युरिया नेहमी जमिनीत पेरून द्यावा मातीतील नत्र निघून जाण्याची कारणे : मातीची धूप - वारा किंवा पाण्याने शेतातून वाहून जाणाऱ्या मातीच्या कणात जोडून असलेला नत्र मातीच्या पृष्ठभागावरून नष्ट होतो. सर्व प्रदेशांमध्ये वारा आणि पाण्याची धूप सामान्य आहे. वाऱ्याची धूप कोरड्या प्रदेशात आणि पाण्याची धूप दमट प्रदेशात अधिक तीव्र असते. वाहून जाणे - जेव्हा नत्र खत पृष्ठभागावर जाते आणि नत्र जमिनीत जाण्यापूर्वी आणि पिकांद्वारे शोषण्यापूर्वी मुसळधार पाऊस पडतो, तेव्हा विरघळलेले नत्र नायट्रेटच्या स्वरूपात पृष्ठभागावरून वाहून जाण्याची शक्यता असते. अमोनिया बाष्पीकरण - जर शेणखत किंवा युरिया पृष्ठभागावर टाकला आणि लगेच जमिनीत मिसळला नाही तर अमोनिया स्वरूपात मोठ्या प्रमाणात नत्र वातावरणात नष्ट होऊ शकते. उबदार हवामानामुळे खत आणि इतर अजैविक नत्र खतांचे अमोनिया स्वरूपात वायूमध्ये रूपांतर होऊ शकते. लीचिंग - मातीच्या स्तरातून विरघळणारे नायट्रेट सहज हलविण्यासाठी पुरेसा पाऊस किंवा सिंचन किंवा दोन्ही असल्यास लीचिंग होते. नायट्रेट शेवटी भूगर्भातील जलचरांमध्ये किंवा भूजलाच्या प्रवाहाद्वारे पृष्ठभागाच्या पाण्यात स्थिरावते.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

गुरुवार दि. २ एप्रिल २०२६





# भाजपा महानगरच्या वतीने महाप्रशिक्षण अभियान अंतर्गत निवासी प्रशिक्षण वर्ग संपन्न

जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीच्या संघटन बांधणीतील मौलाचा दगड ठरणाऱ्या 'पंडित दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण अभियान-२०२६' अंतर्गत भाजपा जालना महानगरातील नवीन जालना, जुना जालना, पूर्व जालना व ग्रामीण मंडळांचे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण वर्ग 'साई लॉन्स, मंठा रोड, राममूर्ती जालना' येथे नुकतेच संपन्न झाले. कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणाऱ्या या वर्गाचे उदघाटन भाजपा नेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले, तर समारोप माजी मंत्री आ. बबनरावजी लोणीकर यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी भाजपा नेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, मंत्री आ. बबनरावजी लोणीकर, आ.भगवानदास सबनानी, जालना ग्रा.जिल्हाध्यक्ष आ.नारायणभाऊ कुचे, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या निवासी वर्गाचे वैशिष्ट्य म्हणजे कार्यकर्त्यांनी दोन दिवस एकत्र राहून पक्षाची विचारधारा आणि कार्यपद्धती समजून घेतली. उदघाटन प्रसंगी बोलताना रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, ''भाजप हा केवळ राजकीय पक्ष नसून विचारांनी प्रेरित असलेले कुटुंब आहे, त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या क्षेत्रातील विकासकामांची अचूक माहिती ठेवून जनतेसमोर मांडली पाहिजे. संघटन मजबूत करण्यासाठी केवळ वरच्या पातळीवरचे नेतृत्व पुरेसे नसते, तर तळागाळातील कार्यकर्त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर म्हणाले की, ''भारतीय जनता पार्टी हा अंत्योदयाचा विचार जपणारा पक्ष असून केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी



योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे ही कार्यकर्त्यांची मुख्य जबाबदारी आहे. ज्याचा बूथ मजबूत, त्याचा विजय निश्चित, हा मंत्र लक्षात ठेवून प्रत्येक कार्यकर्त्याने 'योजना दूत' बनून काम करावे आणि विरोधकांच्या अपप्रचाराला विकासकामांच्या आकडेवारीने चोख उत्तर द्यावे. या प्रशिक्षण वर्गात कैलास गोरंटयाल यांनीही वैचारिक आणि राजकीय दृष्टिकोनातून मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात राजकारणातील बदलते स्वरूप, मतदारांच्या अपेक्षा आणि कार्यकर्त्यांची भूमिका यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, आजचा मतदार अधिक जागरूक झाला आहे. तो केवळ घोषणांवर विश्वास ठेवत नाही, तर प्रत्यक्ष काम आणि परिणाम पाहतो. गाव, वॉर्ड आणि बूथ स्तरावर सक्रिय कार्यकर्ते असतील तर कोणतीही निवडणूक जिंकणे शक्य होते. प्रत्येक कार्यकर्त्याने समाजातील सर्व घटकांशी संवाद वाढवून विश्वास निर्माण केला पाहिजे. महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी आपल्या भाषणात संघटनात्मक मजबुतीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले. ते म्हणाले की, ''भाजप ही केवळ राजकीय पक्ष नसून विचार आणि कार्यपद्धतीवर चालणारी संघटना आहे. आगामी काळात प्रत्येक बूथ हा आपला सर्वात मजबूत किल्ला असला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक बूथवर सक्षम आणि सक्रिय बी.एल.ए. () नेमणे अत्यावश्यक आहे. मतदार यादीचे पुनरावलोकन हे फक्त कागदोपत्री काम नसून ते संघटन विस्ताराचे सर्वात प्रभावी साधन आहे.'' ते पुढे म्हणाले की, ''प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या बूथमधील प्रत्येक मतदाराशी संपर्क ठेवला पाहिजे. नवीन मतदारांची नोंदणी, वगळलेल्या नावांची तपासणी आणि घराघरात जाऊन योजनांची माहिती देणे ही जबाबदारी गांभीर्याने पार पाडली पाहिजे. डिजिटल माध्यमांचा वापर करून संघटन अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे. यावेळी वक्ते म्हणून माजी मंत्री आ.बबनरावजी लोणीकर, कैलास पाटील काय गोरंटयाल, भास्कर आबा दानवे, महानगरपालिका चे अध्यक्ष श्रीमती वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, सौ.संगीताताई गोरंटयाल, युवानेते अक्षय गोरंटयाल, संजय भगत, सतीश जाधव, अर्जुन गेही यावेळी पदाधिकारी, नगरसेवक, शक्ती केंद्र प्रमुख बूथ इत्यादीसह सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

## इंदुबाई ढवळे ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

### माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांची उपस्थिती



अंबड । प्रतिनिधी

मत्स्योदरी शिक्षण संस्था संचलित मत्स्योदरी विद्यालय,चिंचखेड (ता.अंबड) येथे कार्यरत ज्येष्ठ कर्मचारी श्रीमती इंदुबाई भिमराव ढवळे यांचा सेवा गौरव व सेवानिवृत्ती सोहळा काल (ता. ३०) सोमवारी उत्साहात संपन्न झाला.३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर त्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या.

या सेवागौरव व सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सोहळ्याला राज्याचे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच यावेळी व्यासपीठावर माजी प्राचार्य डॉ.भागवतराव कटारे,अंबड मत्स्योदरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद पंडित,अंबड बाजार समितीचे माजी सभापती सतिष होंडे तसेच चिंचखेड येथील मत्स्योदरी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.कंटूले यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या औचित्याने बोलतांना उपस्थित मान्यवरांनी श्रीमती ढवळे यांच्या कार्याचे कौतुक केले. ३२ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात त्यांनी मत्स्योदरी शिक्षण संस्थेत अत्यंत प्रामाणिकपणे आणि निष्ठेने आपली सेवा बजावली असल्याचे सांगत त्यांना सेवा निवृत्तीनंतरच्या भावी सुखद वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी म्हटले की,शिक्षण संस्थेच्या जडणघडणीत निष्ठावान कर्मचाऱ्यांचा वाटा मोठा असतो.श्रीमती ढवळे यांनी आपली तीन दशकांची सेवा समर्पित भावनेने पूर्ण केली, हे कौतुकास्पद आहे.त्यांचे पुढील आयुष्य सुखी, समाधानी तसेच निरोगी जावो अशा शुभेच्छाही दिल्या. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाल,श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन श्रीमती ढवळे यांच्या कार्याचा, निष्ठेचा आणि समर्पणाचा गौरव करण्यात आला. यावेळी श्रीमती ढवळे यांनी मत्स्योदरी शिक्षण संस्था आणि सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या सेवा गौरव समारंभाला खरेदी विक्री संघाचे चेअरमन बाळासाहेब नरवडे, सरपंच नंदकुमार पैठणे, शिवप्रसाद चांगले, नगरसेवक अर्जुन भोजने,अफरोज पठाण,श्री.अटकळ सर, डॉ. संजय काळे, प्रा.रमेश गाढे,कैलास मगरे,भागवत चाबूकस्वार,गौतम ढवळे आदींसह शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर तसेच मत्स्योदरी विद्यालयातील शिक्षक वृंद,शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ आणि ढवळे परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आयडीबीआय बँकेच्या धोरणात्मक विनिवेशावर पुनर्विचार करावे

### खा. डॉ.कल्याण काळे यांचे केंद्र सरकारला पत्र

जालना । प्रतिनिधी

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांना पत्र पाठवून आयडीबीआय बँकेच्या प्रस्तावित धोरणात्मक विनिवेश प्रक्रियेवर पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे. त्यांनी हा विषय देशातील बँकिंग व्यवस्था, ठेवीदारांचा विश्वास आणि वित्तीय समावेशनाशी निगडित अत्यंत महत्त्वाचा व संवेदनशील विषय असल्याचे नमूद केले आहे. आपल्या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की भारत सरकार व यांच्या संयुक्त प्रयत्नांतर्गत मधील ६०.७२ टक्के हिस्सा आणि व्यवस्थापन नियंत्रण हस्तांतरणासाठी धोरणात्मक विनिवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. तसेच यांनी दिनांक ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी आर्थिक निविदा प्राप्त झाल्याची माहिती दिली असून त्यांचे परीक्षण सुरू असल्याचेही नमूद



केले आहे.

खासदार डॉ. काळे यांनी सांगितले की आयडीबीआय बँकेची स्थापना सन १९६४ मध्ये विकास वित्तीय संस्था म्हणून झाली असून देशाच्या औद्योगिक व आर्थिक विकासात तिचे मोलाचे योगदान आहे. गेल्या पाच वर्षांत बँकेने सातत्याने नफा कमावत आपली आर्थिक स्थिती अधिक मजबूत केली आहे. या पुनरुत्थानात केंद्र सरकार व एलआयसी यांनी केलेल्या सुमारे ५०,००० कोटींच्या सार्वजनिक गुंतवणुकीचा मोठा वाटा आहे.सन २००३ मध्ये संसदेत दिलेल्या आश्वासनाचा उल्लेख करत त्यांनी सरकारचा हिस्सा ५१ टक्क्यांपेक्षा कमी न करण्याची हमी देण्यात आली होती, असे नमूद केले. प्रस्तावित विनिवेशामुळे ही मर्यादा कमी होण्याची शक्यता असल्याने ठेवीदारांचा विश्वास आणि आर्थिक स्थैर्य यावर परिणाम होऊ शकतो, अशी त्यांनी चिंता व्यक्त केली. तसेच या निर्णयाचा परिणाम केवळ मालकी हक्कापुरता मर्यादित न राहता प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठा, ग्रामीण व अर्ध-शहरी भागातील बँकिंग सेवा तसेच कर्मचाऱ्यांच्या नोकरी सुरक्षिततेवरही होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामीण भागातील आयडीबीआय बँकेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. या पार्श्वभूमीवर खासदार डॉ. काळे यांनी केंद्र सरकारला विनंती केली आहे की, प्रस्तावित धोरणात्मक विनिवेशावर पुनर्विचार करण्यात यावा तसेच संसदेत दिलेल्या आश्वासनानुसार सरकारचा हिस्सा किमान ५१ टक्के राखण्यासाठी पर्यायी उपाययोजना करण्यात याव्यात. हा विषय सार्वजनिक क्षेत्रातील बँकिंग व्यवस्था, ठेवीदारांचे हित, वित्तीय समावेशन आणि सर्वसमावेशक आर्थिक विकासाशी संबंधित असल्याने यावर गांभीर्याने व संवेदनशीलतेने निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले

## छत्रपती संभाजीनगरला मे अखेर मिळणार ३४ वातानुकूलित ई शहर बस

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगरमध्ये पाणीपुरवठा योजनेसारखीच अवस्था नवीन ३४ इलेक्ट्रिक बस येण्याची झाली आहे. जून २०२३ पासून नवनवीन डेडलाईन दिली जात आहे. यात आता मे २०२६ ची भर पडली आहे. स्मार्ट सिटी प्रशासनाला माहिती अधिकारातून विचारलेल्या विविध प्रश्नांमधून अनेक बाबींचा उलगडा झाला.

शहराची वाढ, विस्तार पाहता सार्वजनिक वाहतूक फार तोकडी आहे. आंतरराष्ट्रीय नियमानुसार शहराला अपेक्षित १ हजार बसच्या तुलनेत फक्त १०० बस (डिझेल) उपलब्ध आहेत. त्यातील साधारण ८० बस नियमित वापरात असतात. त्यामुळे नवीन येणाऱ्या ३४ एसी इलेक्ट्रिक बस थोडासा दिलासा देऊ शकतात. यासाठी 'हवी शुद्ध हवा' अभियानाअंतर्गत 'आम्ही पर्यावरण प्रेमी'( विविध संस्थांचा मंच) स्मार्ट सिटी प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहे. यातून वेगवेगळ्या वेळी, १५ मागण्या करण्यात आल्या. शिवाय काही माहिती मागण्यात आली. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याने रूपेश कलंत्री यांनी माहिती अधिकार अर्ज, त्यानंतर प्रथम अपील दाखल केला. स्मार्ट सिटी बस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार निर्माता कंपनीला यापूर्वी तीन नोटीस बजावण्यात आल्याचे उघड झाले. प्रत्येक नोटीसमध्ये विषय गांभीर्याने घेण्याबद्दल लिहिले होते. मात्र कंपनीने भीक घातली नाही. ८ जानेवारी २०२६ रोजीच्या चौथ्या नोटीसमध्ये, समाधानकारक उत्तर आणि वेळेत बस न दिल्यास दंड, बँक गॅरंटी जप्त करणे, करार रद्द करणे आणि काळ्या यादीत टाकण्याचा इशारा देण्यात आला. अशाच प्रकारचा इशारा यापूर्वीच्या नोटिसांमध्ये देण्यात आला होता, हे विशेष. याशिवाय स्मरणपत्रे देखिल देण्यात आली आहेत. आता मे २०२६ अखेर, ३४ बस देण्याचे कंपनीने कळवले आहे. एक बस नमुनादखल आधीच मिळाली आहे.

## महिलेच्या गर्भाशयावर एकाहून अधिक गाठी

### हिंगोलीत मल्टीपल फायब्रॉइडची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी

हिंगोली । प्रतिनिधी

हिंगोलीत गर्भाशयावर एकापेक्षा अधिक गाठी असलेल्या असलेल्या एका ४५ वर्षीय महिलेवर गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी करून महिलेस जिवदान देण्यात आले आहे. सदर महिलेची प्रकृती सामान्य असून त्यांच्यावर उपचार सुरु असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

औंढा नागनाथ तालुक्यातील जवळाबाजार येथील महिला अनुराधा शर्मा यांना मागील काही दिवसांपासून ओटीपोट दुखीचा मोठा त्रास जाणवू लागला होता. या शिवाय मासीकपाळीमध्ये त्यांना असह्य वेदना होऊ लागल्या होत्या. त्यासाठी त्यांनी औषधोपचार केले मात्र त्याचे योग्य निदान झाले नाही. त्यानंतर त्यांनी हिंगोली येथील स्त्रीरोग तज्ञ डॉ. उमा सोनी यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याकडे तपासणी केली. यावेळी डॉ. सोनी यांनी अनुराधा यांची सर्व माहिती घेऊन तपासणी केली. त्यानंतर सोनोग्राफीमध्ये त्यांच्या गर्भाशयावर मोठ्या संख्येने गाठी असल्याचे दिसून आले. दरम्यान, गर्भाशयावरील या गाठी कमी होत नाहीत तसेच विरघळु शकत नाही त्यामुळे शस्त्रक्रिया करावी लागेल असे डॉ. सोनी यांनी स्पष्ट केले. मात्र रुग्ण अनुराधा यांना मधुमेहाचा आजार तसेच शरीरातील रक्ताची पातळी कमी असल्यामुळे शस्त्रक्रिया करणे जिकरीचे होते. मात्र या परिस्थितीत हिंगोली डॉ. उमा सोनी, भुलतज्ञ डॉ. क्षितीजा पिंपरे यांनी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी वैभव घोंगडे, शिवदास खांडेकर यांनी मदतनीस म्हणून काम केले.

या ठिकाणी सुमारे दिड तास शस्त्रक्रिया चालली. यामध्ये अनुराधा यांच्या गर्भाशयावर तसेच आतील बाजूस एकापेक्षा अधिक गाठी चिकटलेल्या दिसून आल्या तसेच आतडे देखील चिकटलेले दिसून आले. शस्त्रक्रियेनंतर त्यांचे गर्भाशिय काढून चिकटलेले आतडे बाजूला करण्यात आले. अतिशय गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी करून महिलेला जिवदान देण्यात आले असून यामुळे त्या वेदनामुक्त झाल्या आहेत. त्यांच्यावर सध्या उपचार सुरु असून त्यांची प्रकृती सुधारत असल्याचे डॉ. सोनी यांनी सांगितले.


जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१६९३**
**दिनांक - ३०/१२/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती राहुल केशव मगरे रा. चिंचखेड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | यश राहुल मगरे | मुलगा | १२/११/२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


## जय भगवानच्या नामजयघोषात बडेवाडीमध्ये क्षेत्र भगवानगडाचा ९२ व्या नारळी सप्ताहास प्रारंभ

पाथर्डी प्रतिनिधी

राष्ट्रसंत श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९२ व्या वर्षीचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे भगवानगडाच्या दक्षिण बाजूला असलेल्या बडेवाडी ग्रामस्थांनी उचलले आहे श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताहाचा आज प्रारंभ झाला श्री संत भगवानबाबांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम ९२ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असलेल्या पखालडोह या ठिकाणी सुरू केला. त्यांचे पश्चात तीच सप्ताहाची परंपरा श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी अष्टपैलू संत वै.ह.भ.प.गुरुवर्य श्री संत भिमसिह महाराज यांनी सुरू ठेवत भगवानबाबांचे कार्य सुरू ठेवले होते भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर श्री क्षेत्र भगवानगडाचे तृतीय उत्तराधिकारी तथा विद्यमान मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री यांच्या



कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे नारळी सप्ताह वैभवशाली असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक सप्ताहामध्ये आठवडाभर उपस्थित असतात नारळाचे यजमानपद स्विकारलेले ग्रामस्थ आठवडाभर तन मन आणि धन खर्ची घालत श्रीगुरूंची सेवा करत असतात ३१ मार्च रोजी हा महोत्सव प्रारंभ झाला असून सप्ताहामध्ये ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली भागवताचार्य ह.भ.प.श्री.प्रकाश महाराज साठे यांच्या अमृततुल्य रसाळवाणीतून ७ दिवस भव्य श्रीमद् ? भागवत कथा निरूपण सोहळ्याचा उपस्थित लाखो भाविकांना लाभ होणार आहे सप्ताहामध्ये ह.भ.प.महंत श्री.रामगिरी महाराज (येळेश्वर संस्थान येळी) ह.भ.प. भागवताचार्य श्री.तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, ह.भ.प.श्री.ज्ञानेश्वर महाराज जळकीकर ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर ह.भ.प.श्री.प्रभाकर महाराज बोधले पंढरपूरकर श्री क्षेत्र भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प.महंत श्री.कृष्णा महाराज शास्त्री यांच्या कीर्तनसेवा होणार असून सप्ताहाच्या सातव्या दिवशी रात्री ठीक ८:३० ते ११ या वेळेत श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री यांचे जागराचे जाहीर हरीकीर्तन होणार आहे. त्यानंतर काल्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल सप्ताहामध्ये दररोज पहाटे काकडा भजन ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण गाथा भजन हरिपाठ धार्मिक कार्यक्रम होत आहेत.

### बडेवाडीला सहकार्य करा - डॉ.नामदेव शास्त्री

श्री क्षेत्र भगवानगडाचा नारळी सप्ताह पार पडत असलेले बडेवाडी हे गाव मनाने आणि श्रद्धेने खूप मोठे आहे परंतु लोकसंख्येने अत्यल्प असल्यामुळे सप्ताहासाठी येणाऱ्या लाखो भाविकांची जेवणाची गैरसोय होऊ नये म्हणून परिसरातील सर्व गावांनी आलेल्या भाविकांना जेवण वाढण्यासाठी मदत करावी असे आवाहन ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री.नामदेव महाराज शास्त्री यांनी केले.

### भगवानगडाचे चतुर्थ महंत गादीवर बसणार

यावर्षी येणाऱ्या विजयादशमीच्या दसऱ्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत या अमृतमहोत्सवी वर्षामध्ये दसऱ्याच्या दिवशीच श्री क्षेत्र भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प.महंत श्री.कृष्णा महाराज शास्त्री यांचा अभिषेक करून त्यांना श्री क्षेत्र भगवानगडाच्या गादीवर बसवण्यात येणार असल्याची माहिती महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री नामदेव महाराज शास्त्री यांनी स्वतः दिली.

# महेश साखर कारखान्यातील कोट्यवधींची मशिनरी चोरीला

## माजी आ.भीमराव धोंडे यांचा मोठा गौप्यस्फोट; संशयितांची नावे निष्पन्न,लवकरच गुन्हे दाखल होणार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्याची 'कामधेनू' असा लौकिक असलेला आणि अनेक वर्षे बंद अवस्थेत असलेला कडा सहकारी साखर कारखाना पुन्हा एकदा सुरू करण्यासाठी सध्या युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. मात्र,शेतकऱ्यांच्या या आशादायी चित्राला गालबोट लावणारी एक अत्यंत धक्कादायक घटना आता समोर आली आहे. कारखान्याच्या उभारणीचे काम अंतिम टप्प्यात असतानाच, आवारातून तब्बल कोट्यवधी रुपयांच्या मशिनरीची चोरी झाली आहे.या प्रकरणातील संशयितांची नावे निष्पन्न झाली असून, लवकरच याप्रकरणी पोलिसांत रीतसर गुन्हे दाखल केले जातील असा मोठा गौप्यस्फोट माजी आ.भीमराव धोंडे यांनी केला आहे.

आष्टी येथील भगवान महाविद्यालयात बुधवारी दि.१ एप्रिल आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी अशोक साळवे उपस्थित होते.

माजी आ.धोंडे यांनी महेश कारखान्याच्या उभारणीचा, आतापर्यंत आलेल्या संकटांचा आणि सद्यस्थितीचा सविस्तर आढावा पत्रकारांसमोर दिला.अडचणींचा डोंगर पार करत कारखाना अंतिम टप्प्यात माजी आ. धोंडे यांनी माहिती देताना सांगितले की,आष्टी आणि परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी व स्थानिक अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्यासाठी महेश सहकारी साखर कारखाना कोणत्याही परिस्थितीत सुरू करण्याचा आम्ही निर्णय घेतला. या संपूर्ण प्रवासात अनेक मोठी आर्थिक, प्रशासकीय आणि तांत्रिक संकटे उभी राहिली.परंतु, या सर्व अडथळ्यांवर यशस्वीपणे मात करून आता कारखान्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या गाळप हंगामात कारखान्याचे धुराडे पेटलेले दिसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या प्रकल्पामुळे केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे, तर वाहतूकदार, पूरक उद्योग () आणि स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. हा प्रकल्प तालुक्याच्या अर्थचक्राला मोठी गती देईल, असेही ते म्हणाले.

कोट्यवधींच्या चोरीने खळबळ; सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह

कारखान्याचे काम अत्यंत वेगात आणि सकारात्मक वातावरणात सुरू असतानाच अज्ञात चोरट्यांनी कारखान्याच्या महागड्या मशिनरीवर डल्ला मारल्याची गंभीर बाब माजी आ. धोंडे यांनी उघड केली. पान २ वर

### चोरी झाली तरी 'कारखाना सुरू होणारच' –माजी आ.धोंडे यांचा निर्धार



महेश सहकारी साखर कारखाना ही या भागातील शेतकऱ्यांची जीवनवाहिनी आहे. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी आम्ही आतापर्यंत अनेक संकटे झेलली आहेत. आता या चोरीच्या प्रकाराने आम्ही अजिबात खचणार नाही.आमचा निर्धार पक्का असून, कोणत्याही परिस्थितीत येणाऱ्या हंगामात गाळप सुरू करून शेतकऱ्यांच्या अपेक्षा आम्ही पूर्ण करूच असा विश्वास माजी आ. भीमराव धोंडे यांनी व्यक्त केला आहे.

# धुनकवाडच्या विकासासाठी कटिबद्ध राहणार – नवनाथ बन

वडवणी । प्रतिनिधी

धुनकवाड गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असून ग्रामविकासासह विविध शासकीय खात्यांमधून विकासनिधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी केले. ते धुनकवाड ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात बोलत होते.

या वेळी धुनकवाड ग्रामपंचायतीतर्फे सरपंच भागवत गव्हाणे यांच्या हस्ते नवनाथ बन यांचा शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ व ग्रामदैवत धुनकेश्वराची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. याचबरोबर उपस्थित मान्यवरांचाही शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. नवनाथ बन यांचे धुनकेश्वर नगरीत वाजत-गाजत फटाक्यांच्या आतिषबाजी करून स्वागत करण्यात आले.



कार्यक्रमाच्या व्यासपीठावर भाजपाचे सोशल मीडिया प्रदेशाध्यक्ष प्रकाश गाडे, प्रवक्ते राम कुलकर्णी, सरपंच भागवत गव्हाणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आपल्या भाषणात नवनाथ बन यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होत असून ग्रामीण भागालाही विकासाच्या प्रवाहात आणण्यावर भर दिला जात आहे. धुनकवाड गावासाठी अधिकाधिक विकासनिधी मिळवून देत पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी राम कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त करताना धुनकवाड ते पहाडी पारगाव या महत्त्वाच्या रस्त्यासाठी नवनाथ बन पान २ वर

# बीडमध्ये अल्पवयीन मुलाकडून चोरीच्या तीन दुचाकी जप्त; दोन गुन्हे उघड

बीड । प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखा, बीडच्या पथकाने परळी परिसरातून दुचाकी चोरी करणाऱ्या एका विधीसंघर्ष बालकाला (अल्पवयीन मुलाला) ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून चोरीच्या एकूण तीन दुचाकी हस्तगत करण्यात आल्या असून दोन गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

गोपनीय माहितीवरून कारवाई



परळी शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्याचा (गु.र.नं. १८/२०२६) समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू होता. या तपासादरम्यान पोलीस पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, हा गुन्हा एका विधीसंघर्ष बालकाने केला आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित मुलाच्या राहत्या घरी जाऊन त्याला ताब्यात घेतले.

तीन दुचाकी जप्त

पोलिसांनी केलेल्या चौकशीत त्या मुलाने पान २ वर

# धनश्री पतसंस्थेचा ६० लाखांचा दमदार नफा; ८७.९२ कोटींचा भक्कम व्यवसाय

आष्टी । प्रतिनिधी

गेल्या तब्बल सहाव्वीस वर्षांची परंपरा जपत ३१ मार्चलाच ताळेबंद सादर करणाऱ्या आष्टी येथील धनश्री पतसंस्थेने यंदाही आपली आर्थिक कामगिरी जाहीर केली असून सन २०२५-२६ अखेरीस संस्थेला ६० लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. ही माहिती संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ धोंडे यांनी दिली.

आष्टी येथील पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात ताळेबंद सादर करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष लक्ष्मण सुरतवाले, सचिव जितेंद्र शिंदे,कडा शाखेचे शाखाधिकारी रमेश बोराडे यांच्यासह संचालक मंडळ व अधिकारी उपस्थित होते.अध्यक्ष धोंडे पुढे म्हणाले की, सन २०२५-२६ अखेरीस संस्थेचा एकूण व्यवसाय ८७ कोटी ९२ लाख १४ हजार २५४ रुपयांवर पोहोचला आहे. यामध्ये ४८ कोटी ५८ लाख ५२ हजार २१२ रुपयांच्या ठेवी, ३९ कोटी ३३ लाख ६२ हजार ४२ रुपयांचे कर्जवाटप, तसेच १८ कोटी ६५ लाख ४६ हजार ७६७ रुपयांची गुंतवणूक समाविष्ट आहे. संस्थेचा स्वनिधी ५ कोटी ३८ लाख २७ हजार ४९७ रुपयांपर्यंत पोहोचला असून या भक्कम आर्थिक पायावर संस्थेला यावर्षी ६० लाख रुपयांचा नफा मिळाला आहे.

गेल्या २६ वर्षांत धनश्री पतसंस्थेने केवळ आर्थिक क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक बांधिलकी पान २ वर

# बीड जिल्ह्यात वादळी पाऊस वीज पडून शेतकऱ्याचा मृत्यू

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात बुधवारी (दि. १ एप्रिल) दुपारी अचानक वातावरणात बदल होऊन वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट आणि पावसाची सुरुवात झाली. या अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. बीड शहरालगतच्या पाली गावात सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास वीज पडून वसंत रामराव राऊत (वय ६२) यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. शेतात काम करत असताना त्यांच्या अंगावर वीज कोसळल्याने त्यांचा मृत्यू झाला.

बुधवारी अचानक आलेल्या वादळी पावसामुळे शेतकरी हवालदिल झाले असून, हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मागील आठ दिवसांपासून जिल्ह्यात अवकाळी पावसाचे सत्र सुरू असून शेतीचे मोठे नुकसान होत आहे. दरम्यान, वसंत राऊत यांचा विज कडून मृत्यू झाल्याने पाली गावात शोककळा पसरली असून राऊत यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे. पंचनामा करण्यासाठी महसूल प्रशासन घटनास्थळी दाखल होणार असल्याची माहिती मिळाली.

# मोगरा गावच्या पोलिस पाटीलपदी कैलास मानधने यांची निवड

### मान्यवरांच्या हस्ते झाला सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोगरा गावच्या पोलिस पाटीलपदी कैलास मानधने यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते दि.३० मार्च सोमवार रोजी सत्कार करण्यात आला.

माजलगाव उपविभागात नुकतेच पोलिस पाटील भरतीची प्रक्रिया झाली असुन मोगरा गावाच्या पोलिस पाटीलपदी कैलास मानधने यांची नियुक्ती झाली आहे. या नियुक्तीबद्दल कैलास मानधने यांचा डॉ. प्रकाश आनंदगांवकर, जगदीश साखरे, डॉ. कमलकिशोर लड्डा, बी. एन. कुलकर्णी, डॉ. युवराज मुळये, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, पत्रकार कमलेश जाब्रस, दत्ता काळे, बाबू जोशी, शिवसेना तालुका प्रमुख



तुकाराम येवले, प्रशांत पत्की, प्रवीण शेजुळ, प्रा. अशोक काळे, वर्षा बानाईत यांचेसह मान्यवरांच्या हस्ते कैलास मानधने यांचा सत्कार करण्यात आला.

# शिवसेनेच्या संपूर्ण बीड जिल्हा संपर्कप्रमुखपदी मनोज शिंदे यांची नियुक्ती

## शिंदे साहेबांच्या निवडीमुळे बीड जिल्हा शिवसेनेला बळकटी मिळणार –जगताप, मुळूक,गलधर, नवले

बीड । प्रतिनिधी



शिवसेना पक्षाने राज्यभर संघटन अधिक सक्षम आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने व्यापक पातळीवर हालचाली सुरू केल्या असून, त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा संपर्कप्रमुखांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये बीड जिल्हा शिवसेनेच्या संपर्कप्रमुख पदी मनोज शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारधारेचा वारसा पुढे नेत, तसेच शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटन अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. शिंदे यांच्या निवडीमुळे बीड जिल्हा शिवसेनेला नवे बळ मिळाले असल्याची भावना जिल्हाप्रमुख अिनल जगताप,सचिन मुळूक,स्वप्नील गलधर,चंद्रकांत नवले यांनी व्यक्त केली

बीड जिल्ह्यात शिवसेना पक्ष संघटन अधिक प्रभावीपणे उभे राहावे आणि कार्यपद्धतीला गती मिळावी, या उद्देशाने मनोज शिंदे यांच्यावर संपर्कप्रमुख ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. मनोज शिंदे यांनी ठाणे महानगरपालिकेत पाच वेळा नगरसेवक म्हणून काम पाहिले असून सध्या ते नगरसेवक म्हणून कार्यरत आहेत. शिवसेनेची ओळख असलेली आक्रमक कार्यशैली, ठाम निर्णयक्षमता आणि संघटनात्मक कौशल्य ही त्यांची बलस्थाने मानली जातात. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी जवळीक असल्यामुळे त्यांच्या नियुक्तीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या निवडीमुळे बीड जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये नवउत्साह निर्माण झाला असून पक्षकार्य अधिक जोमाने पुढे जाईल, त्यांचा अनुभव आणि नेतृत्वगुण यामुळे बीड जिल्ह्यात शिवसेनेचे संघटन अधिक मजबूत होईल अशी भावना शिवसैनिकांमध्ये निर्माण झाली आहे

# आष्टी तालुक्यात चक्री जुगारावर पोलिसांचा छापा; तिघे ताब्यात, ३२ हजारांचा मुद्देमाल जप्त

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील मराठवाडी (ता. आष्टी) येथे सुरू असलेल्या अवैध चक्री जुगार अड्ड्यावर आंभोरा पोलिसांनी बुधवारी (दि. १ एप्रिल) दुपारी सुमारे ३ वाजता छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत तिघांना ताब्यात घेण्यात आले असून एकूण ३२,६९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींकडून १२,००० रुपये रोख रक्कम तसेच एलसीडी, सीपीयू, माऊस, कीबोर्ड, चक्री चार्ट व इतर जुगार साहित्य असा २०,६९५



रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. यासह एकूण ३२,६९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपी 'चक्री' नावाच्या जुगाराद्वारे ० ते ९ या आकड्यांवर पैसे लावून स्वतःच्या फायद्यासाठी जुगार खेळत व खेळवित असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आंभोरा पोलीस स्टेशनकडून हद्दीतील अवैध धंद्यांवर यापुढेही कठोर कारवाया सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# भाजपचा वटवृक्ष करण्यासाठी लोकनेते मुंडे साहेबांनी केलेले कष्ट मोलाचे

## पं. दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण कार्यशाळेचे ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते थाटात उद्घाटन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

भाजपला वाडी, वस्ती तांड्यावर नेण्याचे काम लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यासह अनेक नेत्यांनी अहोरात्र परिश्रम घेऊन केले, त्यामुळेच पक्षाचा आज वटवृक्षासारखा विस्तार झालेला आपल्याला पहायला मिळत आहे. नेत्यांचे हे कष्ट आपल्याला कदापि विसरता येणार नाहीत, त्यांचे कष्ट आणि आदर्श समोर ठेवून कार्यकर्त्यांनी पक्षाचे संघटन आणखी मजबूत करावे असे सांगत पक्षाची मतदार नोंदणी प्रकिया जोमाने राबवा असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.

भारतीय जनता पक्षाच्या परळी शहर तसेच पूर्व व पश्चिम मंडळाच्या वतीने



आयोजित पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान कार्यशाळेचे उदघाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज श्रध्दा मंगल कार्यालयात झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, प्रवक्ते राम कुलकर्णी, ज्येष्ठ नेते दत्ताप्पा इटके, विकासराव डुबे, बंकटराव कांदे, जीवराज ढाकणे, श्रीहरी मुंडे, जुगलकिशोर लोहिया, संतोष हंगे, रमेश कराड, सतीश मुंडे, रामदास बडे, गणेश कराड, भाजपचे तालुकाध्यक्ष राजेश गिते, वसंत निर्मळ, शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, न.प. बांधकाम सभापती पवन मुंडे,श्रीराम मुंडे, तानाजी वाव्हळे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या,भारतीय जनता पक्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत वाढला आहे. राष्ट्र प्रथम ही आपली विचारधारा आहे. जनसंघापासून ते आतापर्यंत अनेक बदल झाले, राजकारणाच्या प्रत्येक टप्प्यावर आपला पक्ष बदलतो आहे. राष्ट्रप्रेमाने ओतप्रोत भरलेल्या भावनेने आणि एका शिस्तीने पक्ष चालतो आहे. देशातील प्रत्येक नागरिकाचे देशावर प्रेम असले पाहिजे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे हे ध्येय आहे आणि हीच भाजपची नीती देखील असल्याचे ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

मुंडे साहेबांचे कष्ट मोलाचे

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी ज्याप्रमाणे पक्ष वाडी वस्त्यावर पोहोचवला पान २ वर

# रस्त्यावर वाढदिवस साजरा केल्यास गुन्हा दाखल होणार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या वतीने रस्त्यांवर वाढदिवस करणाऱ्यांसाठी महत्वाचे आवाहन करण्यात आले आहे अंबाजोगाई शहरामध्ये रस्त्यावर वाढदिवस साजरे करण्याचे प्रमाण वाढले असून मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात, धिंगाणा घातला जातो यामुळे सामान्य नागरिकांना त्रास होतो शिवाय वाढदिवस साजरा करताना अनेक वेळा आपसात भांडणे होतात.यापूर्वी बीड येथे एका युवकाचा मृत्यू झाल्याची घटना देखील घडलेली आहे.



मागील तीन दिवसांत अशा दोन प्रकरणांमध्ये संबंधितांना पोलीस ठाण्यात आणून कारवाई करण्यात आलेली आहे.यापुढेही अशी कारवाई सतत सुरू राहणार आहे.

त्यामुळे कोणत्याही भागात,रस्त्यावर वाढदिवस साजरे करू नयेत. ज्या ठिकाणी असे प्रकार आढळून येतील, त्या भागातील जागरूक नागरिकांनी वाढदिवस साजरा करणाऱ्या व्यक्तींचे फोटो मोटारसायकल / चारचाकी वाहनांचे नंबर प्लेटचे फोटो ९२२५०९२८२३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर पाठवावेत.म्हणजे तात्काळ गुन्हे दाखल करणे सोईचे होईल असे आवाहन अंबा जोगाई शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक शरद जोगदंड यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

गुरूवार दि.०२ एप्रिल २०२६ । पान ७


# पुणे महापालिकेचे विक्रमी उत्पन्न ; नऊ हजार कोटींचा टप्पा पार




पुणे: महापालिकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात उत्पन्नाच्या बाबतीत नवा विक्रम प्रस्थापित करत ९ हजार कोटींचा टप्पा ओलांडला आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत सुमारे एक हजार कोटी रुपयांची वाढ नोंदवली जाणार असून, महापालिकेच्या इतिहासातील हे आतापर्यंतचे सर्वाधिक उत्पन्न ठरणार आहे. प्रशासनासाठी ही महत्त्वाची कामगिरी असली तरी आता नव्या सत्ताधाऱ्यांसमोर हे उत्पन्न टिकवून ठेवण्याचे आणि वाढवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

महापालिका आयुक्तांनी २०२५-२६ वर्षासाठी १२ हजार ६१८ कोटींचे अंदाजपत्रक मांडले होते. त्यापैकी ३० मार्चअखेर सुमारे ९ हजार कोटींचे उत्पन्न जमा झाले आहे. ३१ मार्च रोजी सुटी असली तरी ऑनलाईन भरणा सुरू राहणार असल्याने अंतिम आकडा ९ हजार २०० कोटींपर्यंत पोहोचण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. उत्पन्नाच्या प्रमुख स्रोतांमध्ये मिळकतकर आणि जीएसटीचा प्रत्येकी सुमारे ३ हजार कोटींचा वाटा आहे. बांधकाम परवानग्यांमधून यंदा अपेक्षेपेक्षा कमी, सुमारे २००० ते २२०० कोटींचे उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय पाणीपट्टीमधून सुमारे २०० कोटी, मुद्रांक शुल्कातून १०० ते १५० कोटी, तसेच शासकीय अनुदान आणि इतर स्रोतांमधून सुमारे ६०० कोटींचे उत्पन्न अपेक्षित आहे. तुलनेत २०२४-२५ या आर्थिक वर्षात महापालिकेला ८ हजार २७२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. भूमिअभिलेख विभागाकडून वहिवाटीच्या मोजण्या बंद केल्यामुळे बांधकाम प्रकल्पांच्या मंजुरीवर परिणाम झाला आहे. तात्पुरते रेखांकन करण्यास नकार मिळत असल्याने अनेक प्रकल्प प्रलंबित राहिले असून, त्याचा थेट परिणाम बांधकाम विभागाच्या उत्पन्नावर झाला आहे. प्रशासक काळात महापालिकेने उत्पन्नवाढ साधली असली तरी आता नव्या नेतृत्वासमोर आर्थिक लक्ष्य पूर्ण करण्याचे आव्हान उभे आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी २०२५-२६ साठी १५ हजार ६६९ कोटींचे उत्पन्न अपेक्षित धरले आहे. मात्र, जाहीर योजनांची अंमलबजावणी करताना हे उद्दिष्ट गाठणे सत्ताधाऱ्यांसाठी कठीण ठरण्याची शक्यता आहे.

# पुण्यात पूरनियंत्रणासाठी नदीपात्रांवर सीसीटीव्ही ; महापालिकेचा महत्त्वाचा निर्णय



पुणे: पावसाळ्यात उद्धवणाऱ्या पूरस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेने महत्त्वाचा निर्णय घेत नदीपात्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे उभारण्यास सुरुवात केली आहे. मुंबई महापालिकेच्या धर्तीवर राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत शहरातील नदीपात्रांतील घडामोडींवर २४ तास लक्ष ठेवले जाणार असून, आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

पावसाळ्यात मुळा-मुठा नद्यांसह शहरातील विविध ओढ्यांना येणाऱ्या पुरामुळे अनेक भागांत पाणी साचून मोठे नुकसान होते. खडकवासला धरणातून पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरणांतील पाणी सोडण्यात आल्यानंतर नदीकिनारी असलेल्या भागांवर पुराचा तत्काळ परिणाम होतो. विशेषतः सिंहगड रस्ता परिसरात दरवर्षी पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका अधिक असल्याचे दिसून आले आहे.

गेल्या वर्षी एकतानगरीसह अनेक ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याच्या घटना घडल्या होत्या. त्या वेळी वेळेवर माहिती आणि तातडीचा प्रतिसाद न मिळाल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर पर्जन्यमापक यंत्रे, सीसीटीव्ही कॅमेरे आणि नियंत्रण कक्ष यांचा समन्वय साधून पूर्वसूचना प्रणाली बळकट करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. योजनेअंतर्गत शहरातील नदीपात्रांमध्ये एकूण १६८ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. त्यापैकी ४४ ठिकाणी कॅमेरे सुरू झाले असून, आणखी १४ ठिकाणी काम प्रगतिपथावर आहे. कॅमेरे अखंड सुरू राहावेत, यासाठी काही ठिकाणी सौरऊर्जेचा, तर काही ठिकाणी नियमित वीजपुरवठ्याचा वापर करण्यात येणार आहे. नदीपात्र परिसरात सुरक्षाव्यवस्था मजबूत करण्यासाठी आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी सीसीटीव्ही बसविण्याची मागणी विविध स्तरांतून करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर महापालिकेने हा निर्णय घेतला आहे.

# आंबेगावात दरोडेखोरांचा धुमाकूळ ; शेतकऱ्याची हत्या

मंचर: आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे येथे दरोडेखोरांनी धुमाकूळ घालत दामोदर जयराम मिंडे (वय ६२) या शेतकऱ्याची धारदार शस्त्राने हत्या केली. ही घटना मंगळवारी (दि. ३१) सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी नीलेश टेमगिरे हनुमान मंदिराच्या कामानिमित्त मंदिराचे विश्वस्त दामोदर मिंडे यांच्या घरी गेले असता त्यांना मिंडे रक्तबंबाळ स्थितीत मृत झाल्याचे आढळले. त्यांच्या डोक्यावर धारदार हत्याराने वार करण्यात आला होता. त्यांनी सरपंच जे. डी. टेमगिरे, उपसरपंच संदीप टेमगिरे, पोलिस पाटील वैशाली टेमगिरे, संजय टेमगिरे यांना याबाबत माहिती दिली. त्यांनी पोलिसांना याबाबत कळविले. मंचर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. याबाबत दामोदर मिंडे यांची विवाहित मुलगी गीतल सतीश गावडे यांनी मंचर ठाण्यात फिर्याद दिली आहे.फिर्यादीत म्हटले आहे की, वडील दामोदर मिंडे हे घरात एकटेच झोपले असताना दरोडेखोरांनी त्यांच्या डोक्यावर शस्त्राने वार करून त्यांची हत्या केली. त्यानंतर घरातील साहित्याची उचकापाचक करून काही वस्तू घराबाहेरील झाडाखाली



टाकल्या. या घटनेनंतर चोरट्यांनी राधू बबन विश्वासराव यांच्या घरासमोर बांधलेला बैल सोडून लोखंडी खुंटी चोरली. घरातील सदस्यांना दरोडेखोरांच्या हालचालीची चाहूल लागताच त्यांनी आरडाओरडा केला. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात तीन संशयित कैद झाले आहेत.त्यानंतर दरोडेखोरांनी लक्ष्मण बबन विश्वासराव यांच्या बंद घराचा दरवाजा तोडून घरातील साहित्याची उचकापाचक केली. त्यांची मुले मुंबईला असल्यामुळे नेमके काय चोरीला गेले हे समजू शकले नाही. त्यानंतर दरोडेखोरांनी तेथून अर्धा किलोमीटरवर असलेले शेतकरी विलास नारायण टेमगिरे यांचे बंद घराचा दरवाजा पहारीने तोडण्याचा प्रयत्न दरोडेखोरांनी केला. पहारीचा आवाज झाल्याने पडवीत झोपलेले विलास टेमगिरे जागे झाले. त्यांनी आरडाओरडा केला असता चोरटे पळून गेले. त्यांनी आजूबाजूच्या लोकांना याची माहिती दिली.

अपर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी अमोल मांडवे, मंचरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीकांत कंकाळ, एलसीबीचे पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, उपनिरीक्षक सनिल धनवे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी ठसेतज्ज्ञ व श्वान पथकाच्या मदतीने तपास सुरू केला आहे. आरोपींचा लवकरच शोध लागेल, असे उपविभागीय अधिकारी मांडवे यांनी सांगितले.

# व्हॉट्सॲप गुंतवणूक आमिषाला बळी ; बारामतीतील दाम्पत्याला १.३० कोटींचा गंडा

बारामती । प्रतिनिधी

व्हॉट्सप लिंकद्वारे एक व्हॉट्सप ग्राप जॉइन करणे येथील दाम्पत्याला चांगलेच महागात पडले. या ग्रापमध्ये समाविष्ट झाल्यानंतर बनावट पद्वारे त्यांना मोहजालात अडकविण्यात आले. जादा परताव्याच्या आमिषाने वेगवेगळ्या बँक खात्यांवर १ कोटी ३० लाख रुपयांची रक्कम भरण्यास सांगण्यात आले. ही रक्कम भरल्यानंतर प्रत्यक्षात जादाचा परतावा तर सोडाच; मूळ रकमेवरही पाणी सोडण्याची वेळ या दाम्पत्यावर आली.

याप्रकरणी शहर पोलिसांनी व्हॉट्सप ग्रापचा डमिन जतिन शर्मा व त्यांना कोणत्या बँकेत रक्कम भरायची हे सांगणारा मोबाईलधारक यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात विवेक अरविंद कुंभोजकर (रा. रामचंद्र मलुकचंदनगर, अशोकनगर, बारामती) यांनी फिर्याद दिली. २ फेबुवारी ते १८ मार्च या कालावधीत ही घटना घडली.

फिर्यादीच्या मोबाईल क्रमांकावर एक लिंक आली. त्याद्वारे ते एका व्हॉट्सप



ग्रापला जोडले गेले. या माध्यमातून ग्रापधारकांकडून शेअर मार्केटिंगचे शिक्षण देण्यात येत होते. त्यानंतर ग्रापवरील सर्व सदस्यांना पची लिंक देण्यात आली. याद्वारे ट्रेडिंग करण्यासाठी सुरुवातीला ५० हजार रुपये भरण्यास सांगण्यात आले.

त्यानुसार फिर्यादीने २५ फेबुवारी रोजी बँक ऑफ बडोदाच्या कुर्ला, मुंबई येथील एका खात्यावर ही रक्कम भरली. या ग्रापद्वारे त्यांना कधी कोणते शेअर्स घ्यायचे, कोणते विकायचे, हे सांगितले जात होते. त्यानंतर ट्रेडिंगसाठी रक्कम कमी पडत असल्याचे सांगत येस बँक गुडीवाडा या खात्यावर रक्कम भरण्यास सांगण्यात आले. यासह अन्य बँक खात्यांचा तपशील पुरविण्यात आला. फिर्यादीने या खात्यांवर एकूण १ कोटी ३० लाख २ हजार रुपयांची रक्कम गुंतविल्यावरही कोणताही परतावा देण्यात आला नाही. बनावट पद्वारे ऑनलाइन फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने २३ मार्च रोजी सायबर हेल्पलाइनद्वारे तक्रार नोंदवली. त्यानंतर पोलिसांतही तक्रार देण्यात आल्याचे पोलिस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांनी सांगितले.

# तांत्रिक बिघाडामुळे लिफ्ट कोसळून तरुणाचा करुण अंत, सोसायटीच्या चेअरमनसह ११ जणांवर गुन्हा दाखल

तळेगाव । प्रतिनिधी

तळेगाव दाभाडे येथील एका गृहनिर्माण संस्थेची लिफ्ट अचानक खाली कोसळल्याने एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी लिफ्टच्या देखभालीकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवत सोसायटीच्या चेअरमनसह ११ सदस्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




दिनेश सुरंगे असे अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. रितेश रामा सुरंगे (वय ३२, रा. किनळे, हवेली) यांनी शनिवारी (दि. २८ मार्च) रोजी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. 'निसर्ग हौसिंग सोसायटी' येथे हा प्रकार घडला. पोलिसांनी सोसायटीचे चेअरमन पुंडलिक हिंदराव वारके (वय ४४) यांच्यासह ११ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीचा भाऊ दिनेश सुरंगे लिफ्टने खाली जात असताना लिफ्ट सहाव्या आणि सातव्या मजल्याच्या दरम्यान अडकली. त्याला बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू असताना लिफ्टचा रोप (दोरी) तुटल्याने लिफ्ट थेट खाली कोसळली.

या भीषण अपघातात दिनेश गंभीर जखमी झाला आणि उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेला सोसायटीच्या कमिटीचा निष्काळजीपणा कारणीभूत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक खामगळ पुढील तपास करत आहेत.

# भरधाव वाहनाच्या धडकेत तरुण दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

भरधाव वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना खराडीतील फॉरेस्ट पार्क परिसरात घडली. याप्रकरणी पसार झालेल्या वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुभम सुनील देवनाथ (२८, रा. केसनंद रस्ता,) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याबाबत गंगाधर गोविंद शिंदे (३२, रा. शिवरकर वस्ती, वाघोली) यांनी खराडी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार शुभम हा २८ मार्च रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास खराडीतील फॉरेस्ट पार्क सोसायटी रस्त्याने निघाला असता, भरधाव वाहनाने दुचाकीस्वार शुभम याला धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या शुभमला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पोलिसांनी फॉरेस्ट पार्क सोसायटी रस्त्यावरील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले असून, सहायक पोलीस निरीक्षक पोटे तपास करत आहेत.

# सुनेत्रा वहिनींनी राज्याच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान व्हावं...' -आमदार सुनील शेळके

पुणे । प्रतिनिधी

मला मंत्रीपद मिळो की न मिळो, पण दादांना मुख्यमंत्रीपद मिळायला हवे होते. ही एक इच्छा अपूर्ण राहिली आहे. आता अजित दादा राहिले नाहीत, तरी त्यांच्या रूपात सुनेत्रा वहिनी मुख्यमंत्री व्हाव्यात, अशी आई एकविरा चरणी प्रार्थना आहे. आम्ही त्यांना घेऊन पुन्हा एकविरा देवीच्या दर्शनाला येऊ, असे साकडे आमदार सुनील शेळके यांनी आई एकविरा देवीच्या चरणाशी घातले आहे.



नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका आणि त्यापूर्वी झालेल्या लोणावळा, वडगाव आणि तळेगाव येथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सर्व ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा डंका वाजला आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना घेऊन आमदार सुनील शेळके यांनी कार्ला गडावरील आई एकविरा देवीचे दर्शन घेतले. यानंतर आयोजित कार्यक्रमात बोलताना आमदार सुनील शेळके यांनी वरील विधान केले.

श्री एकविरा देवी देवस्थान ट्रस्टच्या वतीने सर्व प्रतिनिधींचा विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यापूर्वी राज्यात शिवसेनेची सत्ता स्थापन झाल्यानंतर, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली याच कार्ला गडावर प्रथमच नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार करण्यात आला होता. त्यानंतर मावळच्या इतिहासात दुसऱ्यांदा एवढ्या मोठ्या संख्येने लोकप्रतिनिधी एकत्र येऊन देवीचे दर्शन घेताना पाहायला मिळाले.

# पुण्यात रस्त्यांच्या जागांचा तातडीने ताबा ; जोते तपासणीपासून नवा नियम

पुणे: महापालिकेकडून बांधकाम परवानगी दिल्यानंतर रस्त्यांसाठी राखीव ठेवलेल्या जागांचा ताबा घेण्याच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात येणार आहे. यापुढे जोते तपासणीच्या टप्प्यावरच महापालिका या जागा ताब्यात घेणार असून, ताबा मिळताच त्या ठिकाणी तातडीने डांबरीकरण करून रस्ते सार्वजनिक वापरासाठी खुले करण्यात येणार आहेत, अशी माहिती शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी दिली.



विकास आराखड्यानुसार बांधकाम परवानगी देताना संबंधित विकसकांना रस्त्यासाठी जागा सोडणे बंधनकारक असते. या जागेच्या बदल्यात बांधकाम प्रकल्पांना त्यानुसार एफएसआय दिला जातो. आत्तापर्यंत ही जागा बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्र देण्यापूर्वी ताब्यात घेतली जात होती. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या जागांचा वापर विकसकांकडूनच सुरू राहत होता. काही ठिकाणी ताबा घेतल्याची नोंद असूनही महापालिकेचा प्रत्यक्ष ताबा मिळालेला नसल्याचेही निदर्शनास आले आहे. अनेक ठिकाणी ताबा यादीनंतरही महापालिकेचे नामफलक लावले गेले नाहीत, त्यामुळे या जागांचा सार्वजनिक वापर होत नसल्याची समस्या निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर आता बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर जोते तपासणीच्या वेळीच रस्त्यासाठी सोडलेली जागा महापालिका ताब्यात घेणार आहे. ताबा मिळाल्यानंतर तत्काळ डांबरीकरण करून रस्ता वापरासाठी उपलब्ध करून दिला जाईल तसेच यापूर्वी परवानगी दिलेल्या प्रकल्पांमधील रस्त्यांच्या जागा ताब्यात घेण्यासाठीही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. दरम्यान, समाविष्ट ३२ गावांतील बांधकाम परवानग्यांबाबत पारदर्शकता वाढविण्यासाठी महापालिकेकडून ही माहिती अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. या गावांमध्ये अनेक ठिकाणी अद्याप पाणीपुरवठा व्यवस्था विकसित झालेली नाही. त्यामुळे पीएमआरडीएच्या धर्तीवर महापालिका पाणीपुरवठा योजना पूर्ण होईपर्यंत संबंधित प्रकल्पांना पाणी पुरविण्याची जबाबदारी विकासकांवरच राहील, असे प्रतिज्ञापत्र घेतले जाणार आहे. हे प्रतिज्ञापत्र देखील संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल; जेणेकरून नागरिकांना प्रकल्पातील पाण्याच्या व्यवस्थेबाबत स्पष्ट माहिती मिळू शकेल, असेही पावसकर यांनी सांगितले.

# महिला पत्रकाराशी गैरवर्तन महागात: स्वयंघोषित रील स्टार संतोष पंडितवर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

सोशल मीडियावरील रील स्टार संतोष पंडित याच्याविरोधात पुण्यातील पर्वती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महिला पत्रकाराशी अर्वाच्य भाषा वापरणे, कपडच्यांवरून अश्लील टिप्पणी करणे, तसेच तिच्या इच्छेविरुद्ध मोबाईलमध्ये चित्रीकरण केल्यामुळे त्याच्या विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला. पुण्यातील टिळक रस्त्यावर सोमवारी (३० मार्च) ही घटना घडली.

याप्रकरणी अधिक माहिती अशी की, नाशिक येथील अशोक खरात



प्रकरणाचा निषेध करण्यासाठी टिळक रस्त्यावरील सर्व महाविद्यालयाजवळ आंदोलन ठेवण्यात आले होते. संबंधित पत्रकार तरुणी आंदोलनाचे कव्हरेज करण्यासाठी त्या ठिकाणी गेल्या होत्या. याचवेळी संतोष पंडित घटनास्थळी आला आणि पत्रकारांवर संताप व्यक्त करत अर्वाच्य भाषेत बोलू लागला. त्याने या महिला पत्रकाराच्या अंगावरील कपड्यांवरून अश्लील टिप्पणी केली. तसेच तिच्याकडे अपमानास्पद नजरेने पाहत अश्लील हावभाव केले. इतकेच नव्हे, तर तिच्या इच्छेविरुद्ध मोबाईलद्वारे चित्रीकरण केल्याचेही समोर आले आहे. याशिवाय, आंदोलनात सहभागी झालेल्या इतर महिलांकडेही संतोष पंडितने आक्रमकपणे धाव घेत शिवीगाळ आणि दमदाटी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी संबंधित महिला पत्रकाराने दिलेल्या तक्रारीवरून पर्वती पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ७५, ७८, ३५२, ३५१(१) आणि २९६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष महाले करत असून पुढील चौकशी सुरू आहे.

cmyk